सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, १४ फेब्रुवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३२० | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती बँकेवर सायबर गुन्हेगारांचा ३ कोटी ७० लाख रुपयांवर डल्ला

चंद्रपूर, १३ फेब्रुवारी : चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती बँकेवर सायबर गुन्हेगारांनी तब्बल ३ कोटी ७० लाख रुपयांवर डल्ला मारल्याची माहिती पुढे आली आहे. ७ आणि १० फेब्रुवारी दरम्यान झालेले अनेक व्यवहारांमध्ये सायबर गुन्हेगारांनी दिल्ली आणि नोएडा येथील खात्यांवर रक्कम वळते केल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान पोलिसांनी त्यातील १ कोटी ३२ लाख रुपये वाचविले आहेत.

चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती बँकेतून ७ आणि १० फेब्रुवारी या दोन दिवसात ३४ खातेदारांच्या खात्यामधून ही रक्कम 'आरटीजीएस' करण्यात आल्याचे तपासात पुढे आले आहे. मात्र 'आरटीजीएस' केलेली रक्कम संबंधित खात्यांमध्ये जमा न झाल्याने संशय आला. चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे ऑनलाईन प्रक्रियेत प्रवेश करून हॅक करून तब्बल ३ कोटी ७० लाख ६४ हजार ७४२ रुपयांची बँकेची फसवणूक केली.

दरम्यान, चंद्रपूर येथील रामनगर पोलीस स्थानकात अज्ञात आरोपीं विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून चंद्रपूर पोलिसांनी या प्रकरणाचा अधिक तपास सुरू केला. मात्र, या प्रकरणामुळे जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. बँक अधिकाऱ्यांनी दिलेल्या तक्रारीवरून १० फेब्रुवारी रोजी 'नॅशनल सायबर गुन्हे रिपोर्टिंग'च्या 'पोर्टल'वर त्यांची तक्रार नोंदवून दिली.

झालेले एकूण ३३ 'ट्रांजेक्शन' वर 'फ्रीज' लावण्यात आल्याने बँकेला ६० लाख ६४ हजार ५८२ परत जमा झालेले आहेत, तर उर्वरित ७१ लाख ३४ हजार ७३७ रुपये विविध बँक अकाउंटला 'होल्ड' झाले आहेत. अद्याप पावेतो एकूण १ कोटी ३१ लाख ९९ हजार ३१९ रुपये वाचवण्यात चंद्रपूर पोलिसांना यश आलेले आहे.

# मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू, हिंसाचार कायम

नवी दिल्ली, १३ फेब्रुवारी : अंतर्गत हिंसाचाराने धुमसणाऱ्या मणिपूरमध्ये केंद्र सरकारने राष्ट्रपती राजवट लागू केली आहे. गेल्या आठवड्यातच मुख्यमंत्री एन. बिरेन सिंह यांनी पदाचा राजीनामा दिला होता. राजीनामा देताना राज्यात तीन महिन्यांसाठी राष्ट्रपती राजवट लागू करण्याचाही प्रस्ताव दिला होता.

मेईतेई आणि कुकी समुदायांमधील हिंसाचारामुळे मणिपूरमधील कायदा आणि सुव्यवस्थेची गंभीर स्थिती निर्माण झाली आहे. सातत्याने प्रयत्न करुनही ही परिस्थिती आटोक्यात आणता आलेली नाही. त्या दरम्यान आता केंद्र




सरकारने मोठं पाऊल उचललं आहे. पुढचे काही दिवस राज्यात राष्ट्रपती शासन असेल. त्यानंतर राज्याला नवीन मुख्यमंत्री मिळेल आणि परिस्थिती पूर्ववत करण्यासाठी प्रयत्न केले जातील.

मणिपूरमध्ये आरक्षणामुळे दोन समाजामध्ये वाद पेटलेला आहे. जाळपोळ, मारामाऱ्या, हल्ले, मोर्चे अशा घटना मणिपूरमध्ये सातत्याने घडताना दिसून येत आहेत. त्यातच एका महिलेची नग्न धिंड काढल्याचा प्रकार पुढे होता. तब्बल दोन वर्षांपासून तणावजन्य परिस्थिती आहे. या घटनेमुळे देशभर संताप व्यक्त करण्यात आला होता.

राज्यातील ३५ विविध समुदायांनी शांततेमध्ये जीवन जगायला हवे, असे आवाहन ३१ डिसेंबर रोजी मुख्यमंत्र्यांनी केले होते. मणिपूरमध्ये सुरू असलेल्या हिंसाचारामध्ये ३००हून ्षा अधिक नागरिकांचा मृत्यू झाला असून शेकडो नागरिक बेघर झाले आहेत. यामुळेच बिरेन सिंह यांच्यावर राजीनामा देण्यासाठी दबाव वाढत होता.

दरम्यान अजयकुमार भल्ला यांची मणिपूरच्या राज्यपालपदी नियुक्ती करण्यात आलेली होती. तेव्हापासून राज्यात राष्ट्रपती राजवट लागू होईल, अशी शक्यता वर्तवण्यात आलेली होती. अखेर आज, १३ फेब्रुवारीपासून मणिपूरमध्ये राष्ट्रपती शासन लागू झालं आहे.

## दलाई लामांना मिळणार झेड-सिक्युरिटी

### आयबी रिपोर्टनंतर गृहमंत्रालयाचा निर्णय

नवी दिल्ली, १३ गुरुवार : तिबेटमधील बौद्धांचे सर्वोच्च धर्मगुरू दलाई लामा यांना आता झेड श्रेणीची सीआरपीएफ सुक्षा दिली जाणार आहे. त्यांच्या सुरक्षेच्या संदर्भात इंटेलिजन्स ब्युरोने (आयबी) सादर केलेल्या अहवालाच्या आधारे हा निर्णय खेण्यात आला आहे.

गुप्तचर विभागाने गृह मंत्रालयाला एक अहवाल सादर केला होता ज्यामध्ये दलाई लामांना धोका असण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली होती. यानंतर गृहमंत्रालयाने त्यांची सुरक्षा वाढवण्याचा आदेश जारी केला. तसेच ओडिशाच्या पुरी येथील खासदार संबित पात्रा यांनाही मणिपूरमध्ये झेड श्रेणीची सुरक्षा देण्यात आली आहे. पात्रा हे मणिपूरमध्ये भाजपचे प्रभारी आहेत. वर्तमान दलाई लामा यांचे नाव ल्हामो थोंडुप असून त्यांना



२ वर्षाच्या वयापासून पूर्वसुरींचा पुनर्जन्म म्हणून मान्यता मिळाली त्यानंतर तिबेटची राजधानी ल्हासा येथे १९४० मध्ये त्यांना १४ वे दलाई लामा म्हणून मान्यता देण्यात आली. त्यानंतर १९५० मध्ये चीनने तिबेटवर आक्रमण केले. तिबेंटने त्याविरोधात संघर्ष केला परंतु, तो अपयशी ठरला १९५९ मध्ये चीनच्या विरोधातील उठाव अयशस्वी ठरल्यानंतर दलाई लामा यांनी भारताचा आश्रय घेतला. हिमाचल प्रदेशच्या धर्मशाला येथे ते निर्वासित जीवन जगत आहेत. त्यांना १९८९ मध्ये नोबेल शांतता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचे अमेरिकेत जंगी स्वागत

वॉशिंगटन , १३ फेब्रुवारी : भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा अमेरिका दौरा थाटात सुरू झाला असून, राजधानी वॉशिंग्टन डीसी येथे त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले.ब्लेअर हाऊससमोर उपस्थित भारतीय समुदायाने 'भारत माता की जय' आणि 'मोदी मोदी'च्या घोषणांनी मोदींचे स्वागत केले.पंतप्रधान मोदी यांनी त्याच्या सोशल मीडियावर पोस्ट करत ट्रम्प यांना भेटण्यासाठी आपला उत्साह दर्शवला आहे.



पंतप्रधान मोदींच्या दोन दिवसांच्या दौऱ्यात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासोबत अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा होणार आहे. विशेषतः व्यापार, गुंतवणूक, ऊर्जा, संरक्षण, तंत्रज्ञान आणि इमिग्रेशन यासारख्या विषयांवर दोन्ही नेत्यांची चर्चा अपेक्षित आहे. पंतप्रधान मोदींनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'द' वर आपल्या स्वागताचे छायाचित्र शेअर करून लिहिले की, थोड्या वेळापूर्वी वॉशिंग्टन डीसीला पोहोचलो. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना भेटण्यासाठी आणि भारत-अमेरिका व्यापक जागतिक धोरणात्मक भागीदारी पुढे नेण्यासाठी उत्सुक आहे.

पंतप्रधान मोदी यांच्या अमेरिका दौऱ्यात दोन्ही नेत्यांमध्ये व्यापार, संरक्षण, ऊर्जा, आणि इमिग्रेशनबाबत व्यापक चर्चा होईल. विशेषतः इमिग्रेशन धोरणाच्या संदर्भात भारतीय नागरिकांसाठी सवलती मिळतील का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. याशिवाय, इंडो-पॅसिफिक आणि युक्रेन व पश्चिम आशियातील घडामोडींवरही मोदी आणि ट्रम्प यांची महत्त्वपूर्ण चर्चा अपेक्षित आहे. गेल्या महिन्यात ट्रम्प यांनी दुसऱ्यांदा राष्ट्राध्यक्षपदाची शपथ घेतल्यानंतर मोदी आणि ट्रम्प यांची ही पहिलीच बैठक आहे. त्यामुळे भारत-अमेरिका संबंधांसाठी हा दौरा अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. मोदींच्या या ऐतिहासिक भेटीत कोणते महत्त्वाचे निर्णय घेतले जातात, याकडे संपूर्ण जगाचे लक्ष आहे.

# नवीन 'इन्कम टॅक्स' विधेयक लोकसभेत मंजूर

नवी दिल्ली, १३ फेब्रुवारी : केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांनी आज, गुरुवारी नवीन 'इन्कम टॅक्स' (आयकर) विधेयक सादर केले. वर्तमान आयकर कायद्यातील गुंतागुंत दूर करणे आणि करदात्यांसाठी ते सोपे बनवणे हे त्याचे उद्दिष्ट आहे. हे विधेयक लोकसभेत मंजूर झाले असून ते आता संसदीय समितीकडे पाठवण्यात येणार आहे.

नवीन आयकर विधेयकाचा उद्देश कायदा सोपा आणि स्पष्ट करणे असून या नवीन विधेयकामुळे सुमारे ३ लाख शब्द कमी झाले आहेत. यामुळे कायदा अधिक सुलभ आणि समजण्यास सोपा होईल. तसेच, त्याची अंमलबजावणी करण्यासाठी आणि कर प्रणाली पारदर्शक बनविण्यास मदत करेल. पूर्वीच्या १९६१ च्या आयकर कायद्याची जागा घेण्यासाठी नवीन आयकर



विधेयक सादर करण्यात आले आहे. जुन्या कायद्यात एकूण ८८० पाने होती. नवीन कायद्यात ६२२ पाने आहेत. यामध्ये बहुतेक उपविभाग काढून टाकण्यात आले आहेत. नवीन कायद्याला आयकर कायदा, २०२५ असे म्हटले जाईल. या कायद्यातील जुन्या आणि अनावश्यक तरतुदी काढून टाकण्यात आल्या आहेत. यामुळे कायदा अधिक प्रासंगिक झाला आहे. खटले कमी करणे आणि कर प्रकरणांचे लवकर निराकरण करण्यावर लक्ष केंद्रित केले गेले आहे. सामान्य नागरिकांना ते समजण्यासारखे बनवण्यात आले आहे. जुन्या कायद्यात वापरले जाणारे गुंतागुंतीचे शब्द सोपे करण्यात आले आहेत. यामुळे सामान्य लोकांना कायदा वाचणे आणि समजणे सोपे होईल.

त्याचप्रमाणे आता 'कर निर्धारण वर्ष' (Assessment Year) ऐवजी 'कर वर्ष' (Tax Year) असेल. आर्थिक वर्षाप्रमाणे कर वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च पर्यंत असेल. जर एखादा व्यवसाय या दरम्यान सुरू केला तर त्याचे कर वर्ष त्याच आर्थिक वर्षात संपेल. आता क्रिप्टोकरन्सी आणि इतर डिजिटल मालमत्ता 'भांडवल मालमत्ता' म्हणून गणल्या जातील आणि त्यांच्यावर कर आकारला जाईल. यामुळे डिजिटल मालमत्तेवरील कर प्रणालीमध्ये अधिक स्पष्टता येईल. टीडीएस आणि अनुमानात्मक कर (Presumptive Taxation) हे टेबल स्वरूपात सादर केले गेले आहेत. यामुळे करदात्यांना किती कर भरावा लागेल हे समजणे सोपे होईल. वाद सोडवण्यासाठी डीआरपी (Dispute Resolution Panel).आता कर विवादांचे जलद निराकरण करण्यासाठी डीआरपी निर्णय स्पष्टपणे सादर केले जातील. यामुळे अनावश्यक खटले कमी होतील.

सरकार नवीन कर प्रणालीला प्रोत्साहन देत आहे, परंतु जुनी कर प्रणाली देखील सुरू राहील. अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आधीच सांगितले आहे की, सरकारचा सध्या जुनी कर प्रणाली रद्द करण्याचा कोणताही हेतू नाही. नवीन आयकर विधेयकांतर्गत प्रलंबित कर मूल्यांकने सरकार मंजूर करणार नाही. जुन्या पद्धतीनुसार त्यांचा निपटारा केला जाईल. नवीन कायद्यात अनेक नियम सोपे करण्यात आले आहेत. यामुळे खटले कमी होतील, ज्यामुळे कर विवादांचे जलद निराकरण होईल. याचा फायदा सर्वसामान्यांसह सरकारलाही होईल. अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी ते लोकसभेत सादर केले आहे, जिथे ते मंजूरही झाले आहे. आता ते संसदीय समितीकडे पाठवले जाईल. समितीच्या शिफारशींनंतर ते संसदेत पुन्हा मांडले जाईल. संसदेची मान्यता आणि राष्ट्रपतींची मान्यता मिळाल्यानंतर हा नवीन आयकर कायदा लागू होणार आहे.

# एकात्मिक बाल विकास सेवा योजनाअंतर्गत १८ हजार ८८२ पदे भरणार - आदिती तटकरे

मुंबई, १३ फेब्रुवारी : महिला व बालविकास विभाग अंतर्गत एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत अंगणवाडी सेविका ५६३९ व मदतनीस १३२४३ अशी एकूण १८ हजार ८८२ पदे भरण्यात येणार आहेत. संपूर्ण भरती प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने होणार असून उमेदवारांनी कोणत्याही आमिषाला बळी न पडण्याचे आवाहन महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले. राज्य शासन ७५ हजार पदभरती करणार आहे यापैकी १८ हजार पेक्षा जास्त पदभरती महिला व बाल विकास विभाग करीत असल्याचेही तटकरे यांनी सांगितले.

१४ फेब्रुवारी ते २ मार्च या कालावधीत मुख्यसेविका या पदाची सरळसेवा व निवडीद्वारे ३७४ पदभरतीची परिक्षा होणार आहे.

मंत्रालयात महिला सहकारी संस्था, महिला बचत गट, महिला मंडळ व अंगणवाडीबाबतच्या विविध प्रश्नांबाबत तसेच, भिवंडी शहरातील अंगणवाडी केंद्रांची संख्या वाढविण्याबाबत, कर्मचारी व अधिकारी यांच्या पदभरती संदर्भात मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी सर्व कामांचा आणि पदभरतीसंदर्भात आढावा घेतला.

महिला व बाल विकास मंत्री तटकरे म्हणाल्या की, मुख्यसेविका यांची सरळसेवेने १०२ म्हणजे ८० टक्के पदे, तर निवडीद्वारे २७२ म्हणजेच १०० टक्के पदे भरावयाची आहेत. १४ फेब्रुवारी ते २ मार्च या कालावधीत होणाऱ्या या परिक्षा पारदर्शक वातावरणात होण्यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

राज्यातील एकूण ५५३ बाल विकास प्रकल्प कार्यालय अंतर्गत एक लाख १० हजार ५९१ अंगणवाडी केंद्रे कार्यरत असून, ५६३९ अंगणवाडी सेविका व १३२४३ अंगणवाडी मदतनीस यांची रिक्त पदे भरण्याबाबतही कार्यवाही करण्याचे निर्देश तटकरे यांनी दिले.

याचबरोबर राज्य महिला आयोग, महिला आर्थिक विकास महामंडळ, बाल कल्याण समिती, बाल न्याय मंडळातील रिक्त पदांचीही भरती करण्याचे निर्देश तटकरे यांनी दिले.

महिला बचतगटांचे आदर्श कम्युनिटी किचन

महिला बचत गटांनी एकत्रितरित्या पोषण आहाराकरिता आदर्श कम्युनिटी किचन करावे, यासाठी सर्वतोपरी निधी उपलब्ध करून दिला जाईल. अंगणवाडी आहार पुरवठ्याच्या कामासाठी एका संस्थेला पाच अंगणवाड्या दिल्या जातात. लाभार्थी महिला विकास संस्थेच्या कामाच्या अहवालानंतर अंगणवाड्यांची संख्या वाढविणे अथवा कमी करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.




## कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करुन फुटाळा तलाव परिसरातील अतिक्रमण हटवू - बावनकुळे

मुंबई, १३ फेब्रुवारी : नागपूर येथील फुटाळा तलावाच्या परिसरात अतिक्रमण करुन त्यावर लॉन व निवासी इमारतींचे बांधकाम झाले असल्याचे आढळून आले असून, याबाबत पाहणी व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करुन अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही तातडीने करण्यात यावी, असे निर्देश महसूल मंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. या अतिक्रमणासाठी जबाबदार असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

नागपूरच्या फुटाळा तलावाच्या परिसरात अतिक्रमण झाल्याच्या तक्रारीसंदर्भात श्री.बावनकुळे यांच्या मंत्रालयातील दालनात बैठक झाली. यावेळी आमदार विकास ठाकरे उपस्थित होते.बावनकुळे म्हणाले, या प्रकरणी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करुन तातडीने अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही करण्यात यावी. त्याचप्रमाणे अतिक्रमणासाठी जबाबदार असणाऱ्या सार्वजनिक बांधकाम आणि महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाच्या संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात यावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

जागा नागपूर जिल्हाधिकारी यांच्या मालकीची असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यात आहे. तसेच ३० वर्षे मुदतीकरिता फुटाळा जलाशय परिसर एकात्मीकृत प्रकल्पाकरिता महामेट्रो महामंडळास हस्तांतरीत केलेली आहे.



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## दखल

# बांगलादेशी दहशतवादी भारतात सक्रिय



## देशातील मदरशांवर नजर

**बांगलादेशातील जमात-उल-मुजाहिदीन ही दहशतवादी संघटना भारतात हातपाय पसरण्याचे प्रयत्न करीत आहे. 'जेएमबी'ने अनेक बड्या नेत्यांसोबत बैठक घेऊन पश्चिम बंगाल आणि आसामच्या सीमावर्ती भागात दहशतवाद्यांचे जाळे मजबूत करण्याचे आदेश दिले आहेत.**

जमात-उल-मुजाहिदीन बांगलादेश (जेएमबी) ही दहशतवादी संघटना पश्चिम बंगालमधील अनेक जिल्ह्यांमध्ये दहशतवादी नेटवर्क स्थापन करण्याच्या धोकादायक योजनेसह सक्रिय झाली आहे. पाकिस्तानी गुप्तचर संस्था आयएसआयच्या मदतीने मान्यता नसलेल्या पश्चिम बंगालच्या अनेक मदरशांवर नजर ठेवून आहे. या ठिकाणी जेएमबी दहशतवादी मॉड्युल तयार करत असून दहशतवादी नेटवर्क वाढवत असल्याचा स्पष्ट इशारा गुप्तचर यंत्रणांनी दिला आहे.


सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आयएसआयने बांगलादेशस्थित जमात-उल-मुजाहिदीनच्या अनेक बड्या नेत्यांसोबत बैठक घेतली असून पश्चिम बंगाल आणि आसामच्या सीमावर्ती भागात दहशतवादी नेटवर्क मजबूत करण्याचे आदेश दिले आहेत. पश्चिम बंगालमधील मालदा, मुर्शिदाबाद आणि उत्तर दिनाजपूर आणि आसाममधील बरपेटा, नलबाडी, धुबरी जिल्ह्यांना लक्ष्य केले जात आहे. जेएमबीने यापूर्वीही या जिल्ह्यांमध्ये दहशतवादी मॉड्यूल तयार केले होते, जे अद्याप सक्रिय नाहीत, परंतु जेएमबीला पुन्हा ते सक्रिय करण्याचे आदेश मिळाले आहेत.

गुप्तचर यंत्रणांनी नुकतेच राज्य पोलिस आणि कोलकाता पोलिसांच्या विशेष टास्क फोर्सला याबाबत सतर्क केले आहे. यानंतर संपूर्ण राज्यात दक्षता वाढवण्यात आली आहे. जेएमबीचे दहशतवादी सदस्य लहान गटातील सरकारी मान्यता नसलेल्या शैक्षणिक संस्थांच्या (मदरसा) शिक्षकांशी संपर्क साधून त्यांचे ब्रेनवॉश करण्याचा प्रयत्न करत असल्याचे सांगण्यात येत आहे. यानंतर या संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना भरती करून जिहादी दहशतवादी विचारसरणीचा प्रचार केला जात आहे. यापूर्वीही अशाच पद्धतीने जेएमबीने अनेक ठिकाणी गुप्त शैक्षणिक संस्था स्थापन करून विद्यार्थ्यांची दिशाभूल केली होती.

वृत्तानुसार, आयएसआय जेएमबीच्या दहशतवादी सदस्यांना आर्थिक मदतही करत आहे. जेएमबीच्या दहशतवाद्यांनी या भागात गुप्त पद्धतीने आपले नेटवर्क वाढवावे आणि भविष्यात मोठ्या हल्ल्यासाठी प्रशिक्षित व्हावे, हाच आयएसआयचा उद्देश आहे. जेएमबीच्या नवीन सदस्यांना पाकिस्तानमध्ये प्रशिक्षण दिले जाऊ शकते, असे सांगण्यात येत आहे. याशिवाय आयएसआय बांगलादेशात देखील दहशतवादी प्रशिक्षण शिबिर सुरू करण्याची शक्यता आहे, जिथे या नवीन सदस्यांना स्फोटके बनवण्याचे आणि शस्त्रे वापरण्याचे प्रशिक्षण दिले जाईल.

गुप्तचर संस्थांच्या माहितीनुसार, 'बिग बांगलादेश' निर्माण करण्याचे जेएमबीचे स्वप्न असून यासाठीच या संघटनेचे दहशतवादी भारतातील आसाम व पश्चिम बंगालमध्ये सक्रिय आहेत. आसाम आणि पश्चिम बंगालमधील काही जिल्हे बांगलादेशला जोडण्याचे या दहशतवादी संघटनेचे ध्येय आहे. जमात-उल-मुजाहिदीनचा हा कट उधळून लावण्यासाठी केंद्र सरकारच्या यंत्रणा जुन्या स्लीपर सेलच्या सदस्यांवर लक्ष ठेवून आहेत. राज्य पोलिस आणि केंद्रीय यंत्रणांच्या संयुक्त प्रयत्नांनी, या धोकादायक दहशतवादी संघटनेच्या सदस्यांवर कडक पाळत ठेवली जात आहे, जेणेकरून जेएमबी नेटवर्कला बंगालमध्ये पसरण्यापासून रोखता येईल.

## धार्मिक पर्यटन



# अयोध्येत घडला नवा विक्रम

## १ कोटींहून अधिक भाविक राम मंदिरात दाखल

यंदाच्यावर्षी रामनगरी अयोध्येने नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. २६ जानेवारी ते वसंत पंचमी म्हणजेच ३ फेब्रुवारीपर्यंत एक कोटीहून अधिक भाविक श्री क्षेत्र अयोध्येत पोहोचले आहेत. श्रीरामाच्या जयघोषात भक्त तल्लीन झाले आहेत. कडेकोट प्रशासकीय बंदोबस्तात अयोध्येला पोहोचणारा प्रत्येक भाविक आनंदी आहे आणि भगवान श्रीरामचंद्रांबरोबरच मोदी आणि योगी यांचाही जयजयकार करीत आहे. सोमवारी वसंत पंचमीला लाखो भाविकांनी स्नान करून पूजा केली.

श्रीरामललाची भव्य मंदिरात प्रतिष्ठापना केल्यानंतर प्रथमच प्रयागराजमध्ये महाकुंभाचे आयोजन करण्यात आले आहे. महाकुंभासाठी येणारे भाविकही अयोध्येला पोहोचतील, असा अंदाज आधीच होता. हे पाहता मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनीही अयोध्येतील व्यवस्थेवर लक्ष ठेवण्यासाठी सरकारी अधिकाऱ्यांची फौज तैनात केली होती. एकाही भाविकाला त्रास होऊ नये, कुणाचीही गैरसोय होऊ नये अशा सक्त सूचना देण्यात आल्या. २ फेब्रुवारीला मिल्कीपूरमध्ये जाहीर सभेनंतरही अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या होत्या.

### स्नानानंतर मठ आणि मंदिरांमध्ये भाविकांची गर्दी

अयोध्येत आयेध्येमध्ये वसंत पंचमीला सकाळी स्नानाला सुरुवात होते. दुपारी उशिरापर्यंत स्नान आणि दान करण्याची प्रक्रिया सुरू होती. दरम्यान, दर्शनासाठी भाविकांनी मठ आणि मंदिरांकडे मोर्चा वळवला. सायंकाळी उशिरापर्यंत श्रीराम मंदिर आणि हनुमानगढी येथे दर्शनासाठी भाविकांची रीघ लागली होती.

### दररोज तीन लाख भाविकांचे आगमन

श्रराम मंदिर हे भाविकांच्या श्रद्धेचे केंद्र राहिले आहे. दररोज सुमारे तीन लाख भाविक रामललाचे आशीर्वाद घेत आहेत. यासाठी ट्रस्टने व्यापक व्यवस्था केली आहे. मंदिर १८ तास दर्शनासाठी खुले ठेवण्यात आले आहे. त्याचबरोबर हनुमान गढीमध्ये दररोज भाविकांच्या रांगा पाहायला मिळत आहेत.

### भाविकांच्या सुरक्षेला प्राधान्य

प्रयागराजमध्ये स्नानासाठी मोठा परिसर आहे. परंतु अयोध्येत रामलला भक्तांच्या केंद्रस्थानी आहे. अशा स्थितीत प्रचंड संख्येने जमलेल्या जनसमुदायावर नियंत्रण ठेवणे सोपे नव्हते. परंतु प्रशासयकीय जाण आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कुशल रणनीतीमुळे ते सोपे झाले. रस्ता वळवण्यात आला असून याशिवाय पार्किंगचीही व्यवस्था करण्यात आली आहे, असे विशेष पोलिस महानिरीक्षक प्रवीण कुमार यांनी सांगितले. अयोध्येत मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून सुरक्षा निकषांच्या आधारे भाविकांना दर्शन दिले जात आहे, असे ते म्हणाले.

विभागीय आयुक्त गौरव दयाल म्हणाले की, आमचे अधिकारी यात्रा परिसरात चोवीस तास लक्ष ठेवून आहेत. २५ ते ३० हजार लोकांची राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. याशिवाय उघड्यावर झोपणाऱ्यांना निवारागृहात पाठवण्यासाठी वाहने तैनात करण्यात आली आहेत. मोठ्या संख्येने भाविक अयोध्येला पोहोचले आहेत. त्यांच्या सुविधांची काळजी घेतली जात आहे, असेही गौरव दयाल यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

(पांचजन्यवरून साभार)



# हळदीचे दूध पिण्याचे विशेष फायदे

## आरोग्य

महकसिंह

**हळद ही आयुर्वेदिक गुणधर्मांनी परिपूर्ण मानली जाते. जर तुम्ही हळद दुधात मिसळून ते दूध प्राशन केले तर तुमच्या शरीराला अनेक फायदे मिळू शकतात. तुमची प्रतिकारशक्ती मजबूत करण्यासाठी तुम्ही हळद आणि दुधाचे सेवन करू शकता. हळदीमध्ये अँटिसेप्टिक आणि अँटिबायोटिक गुणधर्म आढळतात. याशिवाय दुधात कॅल्शियम मुबलक प्रमाणात आढळते. आज या लेखाच्या माध्यमातून आम्ही तुम्हाला हळदीचे दूध पिण्याचे जबरदस्त फायदे सांगणार आहोत.**

भारतीयांच्या स्वयंपाक घरात आवर्जून आढळणारा पदार्थ म्हणजे हळद. हळदीला भारतीयांच्या दैनंदिन जीवनात अतिशय महत्त्वपूर्ण स्थान आहे. हळदीचे महत्त्व सारेच जाणून आहेत. दुधात हळद टाकल्याने त्याची ताकद दुप्पट होते. हिवाळ्यात लोक हळदीच्या दुधाचे सेवन करतात. पण रोज हळदीचे दूध प्यायल्यास अनेक फायदे मिळतात.

हळद ही आयुर्वेदिक गुणधर्मांनी परिपूर्ण मानली जाते. जर तुम्ही हळद दुधात मिसळून ते दूध प्राशन केले तर तुमच्या शरीराला अनेक फायदे मिळू शकतात. तुमची प्रतिकारशक्ती मजबूत करण्यासाठी तुम्ही हळद आणि दुधाचे सेवन करू शकता. हळदीमध्ये अँटिसेप्टिक आणि अँटिबायोटिक गुणधर्म आढळतात. याशिवाय दुधात कॅल्शियम मुबलक प्रमाणात आढळते. आज या लेखाच्या माध्यमातून आम्ही तुम्हाला हळदीचे दूध पिण्याचे जबरदस्त फायदे सांगणार आहोत.

### वेदना दूर होतात

रोज रात्री हळदीचे दूध प्यायल्याने सांधेदुखीपासून आराम मिळतो. जर तुम्हालाही सांधेदुखीचा त्रास होत असेल तर रोज रात्री झोपण्यापूर्वी हळदीचे दूध प्या. हे दूध प्यायल्याने जळजळ होण्याच्या समस्येपासूनही आराम मिळतो.

### आतड्याशी संबंधित समस्यांवर गुणकारी

हळदीचे दूध प्यायल्याने पोटातील अल्सर आणि तोंडाचा अल्सर देखील दूर होतो. त्याचबरोबर जर तुम्हाला आतड्यांशी संबंधित समस्या असतील तर दररोज हळदीचे दूध प्यावे. या दुधामुळे तुमच्या अनेक समस्या दूर होतात.

### रोगप्रतिकारशक्ती होते मजबूत

हळदीचे दूध प्यायल्याने रोगप्रतिकारशक्ती वाढते आणि हाडेही मजबूत होतात. त्यामुळे जर तुमची प्रतिकारशक्ती कमकुवत असेल तर तुम्ही रोज रात्री झोपण्यापूर्वी हळदीचे दूध पिऊ शकता.

### स्मरणशक्तीसाठी उत्तम

हळदीचे दूध प्यायल्याने मेंदू तीक्ष्ण होतो. रोज याचे सेवन केल्याने स्मरणशक्ती वाढते आणि तुमची विचार करण्याची क्षमता वाढते. त्यामुळे रोज झोपण्यापूर्वी हळदीचे दूध प्यावे. त्याचबरोबर जर तुमचे डोके नेहमी दुखत असेल तरीही तुम्ही हळदीचे दूध पिऊ शकता.

### पचनशक्ती होते मजबूत

हळदीचे दूध प्यायल्याने तुमची पचनक्रिया मजबूत होते. त्याचबरोबर तुमचे अन्नही सहज पचते. त्यामुळे तुम्हीही रात्री झोपण्यापूर्वी हळदीचे दूध प्यायलात तर पोटाशी संबंधित समस्यांना सामोरे जावे लागणार नाही.

### सर्दी आणि खोकल्यापासून आराम

हिवाळ्यात सर्दी आणि खोकला ही एक सामान्य समस्या आहे. यापासून आराम मिळवण्यासाठी तुम्ही रात्री हळद टाकून कोमट दूध पिऊ शकता. हे शरीर आतून उबदार ठेवण्यास मदत करते आणि सर्दी आणि खोकल्यापासून आराम देते.

### त्वचा होते निरोगी आणि चमकदार

जर तुम्ही रात्री झोपण्यापूर्वी हळदीच्या दुधाचे सेवन केले तर ते तुमची त्वचा निरोगी आणि चमकदार बनवू शकते. हळद आणि दुधात आढळणारे गुणधर्म त्वचेसाठी चांगले मानले जातात.

### तणाव दूर

रात्री झोपण्यापूर्वी हळदीचे दूध प्यायल्याने तणावापासून आराम मिळतो. याशिवाय जर तुम्हाला निद्रानाश असेल तर रोज हळदीचे दूध पिणे फायदेशीर ठरू शकते.

(पांचजन्यवरून साभार)

## जीवनशैली

# शारीरिक व मानसिक संतुलनासाठी नौकासन



योगासनांच्या मालिकेत ज्या आसनांना अतिशय महत्त्वपूर्ण मानले जाते त्यात नौकासनाचा निश्चितच समावेश होतो. या आसनात शरीराची रचना तरंगत्या नौकेसारखी भासते म्हणून या आसनाला 'नौकासन' म्हणतात. हठयोगाच्या प्रमुख ग्रंथात या आसनाचा निर्देश आढळत नाही. परंतु, 'कपाल कुरण्टक योग' या सुमारे १५० वर्षांपूर्वीच्या पाण्डुलिपीमधील हस्तलिखितात याचे वर्णन आढळते. हे आसन करायला सोपे असले तरी त्यासाठी ताकद लागते. परंतु, शरीर संवर्धन, पाठीच्या व पोटाच्या स्नायूंना सशक्त करण्यासाठी, मेरुदंड कणखर बनविण्यासाठी हे आसन विशेष उपयोगी आहे. धनुरासन करण्यापूर्वी हे आसन केल्यास पोटाच्या व पाठीच्या स्नायूंसाठी हितकर ठरते.

**कृती** : पाठीवर झोपून किंवा पोटावर झोपून अशा दोन्ही प्रकारांनी हे आसन करता येते.

पाठीवर झोपून नौकासन करतानाची कृती : पाठीवर म्हणजे उताणे झोपावे. हात शरीरापाशी सरळ ठेवावे. श्वास सोडून दोन्ही पाय अर्ध हलासनाप्रमाणे (उत्तानपादासना प्रमाणे) सावकाश वर उचलावेत. याच वेळी धड, डोके व हातही वर उचलावेत म्हणजे शरीर अर्ध गेलाकार होऊन कंबरेचा शेवटचा भाग किंवा नितंबांचा काही भाग यावर तोलून धरता येईल. १० ते १५ सेकंद या स्थितीत थांबून आधी पाय खाली आणावेत व नंतर डोके व धड खाली टेकवावे. या आसनात नाभिप्रदेशावार दाब पडतो. शक्य असल्यास या आसनाची पुनरावृत्ती करावी.

**लाभ** : या प्रकारात पोटाचे समोरचे उभे स्नायू (Rectus abdominis) चांगले आकुंचित पावतात. नियमित असा व्यायाम केल्यास ते अधिक कणखर होतात. त्यांचा स्नायूताण उत्तम राखला जातो. त्यामुळे पोट सुटत नाही. तेथे चरबी साठू शकत नाही. अंतर्गळ (Hernia) यासारखे रोग होत नाहीत. मांड्यांच्या स्नायूंना देखील व्यायाम मिळत असल्याने त्या प्रमाणबद्ध राहतात. पाठीचा कणा सशक्त राहतो. बद्धकोष्ठता दूर होते. भूक वाढते. शारीरिक व मानसिक संतुलन वाढते.

पोटावर झोपून नौकासन करतानाची कृती : पोटावर पालथे झोपून दोन्ही हात डोक्यासमोर जमिनीवर ठेवावेत. हातांचे पंजे पालथे ठेवावेत. किंचित श्वास घेऊन शलभासनाप्रमाणे दोन्ही पाय ताठ ठेवून वर उचलावेत. याच वेळी दोन्ही हात, डोके व छाती देखील वर उचलावी. वर बघावे. ५ ते १५ सेकंद या स्थितीत थांबून आसन सोडावे. पाय व हात नियंत्रित वेगाने एकच वेळी खाली येऊ द्यावेत. आसन पुन्हा एकदा करता येईल. नंतर मकरासनात विश्रांती घ्यावी. या आसन प्रकारात पोटावर दाब येतो, म्हणून पोटाचा आकार मोठा असल्यास हे आसन शक्यतो करू नये.

**लाभ** : या प्रकारात पाठीचा कणा मागे वाकविला जातो. तेथील स्नायू आकुंचित होतात. त्याचवेळी पोटावरील स्नायू ताणले जातात. नियमित हा व्यायाम केल्यास त्यांचा स्नायूताण सुयोग्य स्तरावर कायम राहतो. नाभिजवळ पोटावर दाब पडतो. पचनसंस्था कार्यक्षम राहते. बद्धकोष्ठता दूर होते. मानेचे, पाठीचे, कंबरेचे दुखणे असे विकार होत नाहीत. पोट वाढत नाही. दिवसभर उत्साह राहतो.

### पचन सुधारण्यास मदत करते

नौकासन हे शरीराच्या खालच्या भागावर परिणाम करते. त्यामुळे खालच्या ओटीपोटाच्या स्नायूंवर हे आसन कार्य करत असल्याने, यामुळे पचन सुधारते. स्नायूंना (मसल्स) घट्ट केल्याने पोटाच्या खालच्या अवयवांवर याचा सकारात्मक परिणाम होतो, ते पचनसंस्थेला अधिक चांगले करण्यासाठी देखील मदत करते.

### आत्मविश्वास वाढतो

नौकासनाचा नियमित आणि योग्य सराव केल्यास आत्मविश्वास वाढतो आणि शरीराचे संतुलन सुधारते. संतुलनावर लक्ष केंद्रित केल्याने तणाव आणि लक्ष केंद्रित न होण्याशी संबंधित समस्यांपासून देखील या आसनामुळे आराम मिळतो. दोन्ही प्रकार आलटून पालटून केल्यास फायदे लवकर मिळतात.


**विधिनिषेध** : ज्यांना पोटाचे विकार, हर्निया, उच्चरक्तदाब, कंबरदुखी अशा प्रकारचे विकार आहेत. त्यांनी निदान सुरुवातीला हे आसन करू नये. पुढे इतर आसनांचा अभ्यास बरेच दिवस केल्यावर योग शिक्षकाच्या मार्गदर्शनानुसार हे आसन करावे. घाईघाईने, शरीरास झटके देऊन, जबरदस्तीने, क्षमतेपेक्षा जास्त प्रयत्न करून हे आसन करू नये. पाय गुडघ्यात वाकवू नयेत. पाठीवर पडून करताना श्वास सोडून व पोटावर पडून करतात किंचित श्वास घेऊन हे आसन करणे शरीरशास्त्रानुसार योग्य आहे. आसन २-३ वेळा करून झाल्यावर विश्रांती घ्यावी.

नौकासन हे योगशास्त्रातील एक अतिशय चांगले आसन आहे. निरोगी शरीरातच निरोगी मन वसते. नौकासन केवळ चयापचय सक्रिय करत नाही तर, तुमचे मन स्थिर ठेवण्यास देखील मदत करते आणि आजच्या धावपळीच्या, धकाधकीच्या जीवनात शरीराचे संतुलन राखणे ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. नौकासन तुमच्या शरीरात संतुलन निर्माण करण्याशी संबंधित गुणांना विकसित करण्यास मदत करते.

## व्यक्तिमत्त्व

# वराहमिहिर; प्रसिद्ध भारतीय गणिती

ज्योतिषशास्त्राच्या अनेक शाखांवर ग्रंथलेखन करणारे प्रसिद्ध भारतीय गणिती व ज्योतिषी, अशी वराहमिहिर (सु. ४९० ते ५८७) यांची ओळख आहे. त्यांचे व्यक्तिज्योतिष, स्थान ज्योतिष व गणित असे स्वतंत्र ग्रंथ आहेत.



वराहमिहिर दीर्घकाल उज्जैनमध्ये रहात होते. त्यांचे वडील आदित्यदास यांच्याकडून ज्योतिषशास्त्राचे प्राथमिक ज्ञान वराहमिहिरांस मिळाले. पाश्चिमात्य ज्योतिषशास्त्राचा त्यांनी अभ्यास केला. त्यांचा फलज्योतिषावर व शकुनावर फार विश्वास होता. त्या वेळी फलज्योतिष व खगोलशास्त्र यांसंबंधी जेवढे ज्ञान होते ते सर्व त्यांच्या ग्रंथांतून आले आहे. त्यांनी रचिलेले ग्रंथ व त्यांचे स्वरूप असे आहे.

**पंचसिद्धांतिका** : या ग्रंथात पौलिश, रोमक, वसिष्ठ, सौर व पैतामह अशा पाच प्राचीन सिद्धांतांचा सारांश दिला आहे. यांतील कोणताही सिद्धांत त्यांचा स्वतःचा नाही. यामध्ये सूर्यसिद्धान्तोक्त मध्यम ग्रहास स्वतःचा बीज संस्कार सांगितला आहे. पाच सिद्धांतांपैकी ज्या गोष्टी अनुभवास येतात व ज्या सामान्य रीती उपपत्तीस अनुसरून शुद्ध आहेत असे दिसून आले त्या या ग्रंथांत दिल्या आहेत. देशांतर, छायासाधन, ग्रहण, छेद्यक यांसंबंधीच्या स्वतःच्या रीतींचा सर्व ग्रहांच्या स्थानविषयक गणिताचा समावेश या ग्रंथात केला आहे. हा गणित सुगम करण्याचा करण ग्रंथच आहे. यामध्ये शके ४२७ हे वर्ष आरंभवर्ष मानले असून ते वराहमिहिरांचे जन्मवर्ष आहे की ग्रथारंभ वर्ष आहे, यावर एकमत नाही.

यांतील त्रैलोक्य संस्थान नामक तेराव्या अध्यायात विश्वाची रचना आणि अन्य गोष्टी आहेत. पृथ्वीचा गोल अंतरिक्षात अधांतरी फिरत आहे, हे वराहमिहिरांना माहीत होते. १४ व्या अध्यायात काही यंत्रांचे वर्णन व काही रीतींची माहिती दिलेली आहे. वराहमिहिरांनी प्रथम करण ग्रंथ केला पण पुढे त्यांचे लक्ष फलज्योतिष व नाना प्रकारचे सृष्टिचमत्कार, पदार्थांचे गुणधर्म व त्यांचा व्यवहारात उपयोग यांकडे गेले. भास्कराचार्यांनी त्यांची स्तुती केली आहे व आपल्या अनेक ग्रंथांत वराहमिहिरांची वचने आधारास घेतली आहेत.

**बृहत्संहिता** : हा त्यांचा दुसरा ग्रंथ छंदोबद्ध असून त्यांची भाषा काव्यमय आहे. यात सूर्य, चंद्र आणि ग्रह यांच्या गती व त्यांची फले त्याचप्रमाणे अगस्ती, सप्तर्षी यांच्या उदयकालाची फले व ग्रहणे इ. ज्योतिषशास्त्रीय माहिती विस्ताराने दिली आहे. यांशिवाय भरतखंडाच्या निरनिराळ्या विभागांवरील भिन्न भिन्न नक्षत्रांचे आधिपत्य, नक्षत्रव्यूह, ग्रहांची युद्धे व समागम फले, वर्षफल, रवीजवळील नक्षत्राची फले, पर्जन्यगर्भ लक्षण, गर्भधारणा वर्षण, पर्जन्यवृष्टिमान व पर्जन्य मापण्याची रीत, नक्षत्रांच्या चंद्राशी होणाऱ्या योगाची फले, संध्यासमयीचा रक्तिमा, भूकंप, उल्का, खळे, इंद्रधनुष्य इत्यादी सृष्टिचमत्कारांची चर्चा, पक्ष्यांच्या दर्शनांचे फल, दिव्य अंतरिक्ष व भौम या उत्पादनांचे वर्णन, गृहरचना, भूमिजलाचा शोध, चुना तयार करण्याची रीत, देवप्रतिमानिर्मिती, रत्नपरीक्षा, दीप लक्षण, दंतधावन, शकुन, तिथिनक्षत्रकरण यांची फले व गोचर ग्रहांची फले अशा विविध प्रकारच्या विषयांची चर्चा निरनिराळ्या अध्यायांत आली आहे. याव्यतिरिक्त समास संहिता, वट कणिका, बृहज्जातक, लघुजातक, बृहदब यात्रा, योग यात्रा, टिकणिका यात्रा व विवाह पटल हे त्यांचे इतर ग्रंथ आहेत. लघुजातक हे बृहज्जातकाचे संक्षिप्त रूप असून दोन्ही जातकग्रंथ आजही ज्योतिषांमध्ये प्रचारात आहेत व कित्येक भारतीय भाषांत त्यांची भाषांतरे झालेली आहेत. जे. एच्. केर्न यांनी बृहत्संहितेचे इंग्रजीत व अलब बीरूनी यांनी लघुजातकाचे अरबी भाषेत भाषांतर केले आहे. वराहमिहिरांच्या ग्रंथांवरील अनेक टीकांपैकी यात्रा, बृहज्जातक, लघुजातक आणि बृहत्संहिता या ग्रंथांवरील भटोत्पल यांच्या टीका प्रसिद्ध आहेत. वराहमिहिरांचा मुलगा पृथुयश यांनी षट्पंचाशिका हा ग्रंथ लिहिला आहे.

(संदर्भ : विश्वकोश)

## सँडविच जनरेशनला भविष्यात आर्थिक सुरक्षेची चिंता

नाशिक : आपले पालक आणि मुलांना सर्वोत्तम जीवन उपलब्ध करून देण्यावर लक्ष केंद्रित केल्याने, भारतातील सँडविच पिढी स्वतः च्या भविष्यासाठी तयार नाही असे वाटते. मी कितीही बचत केली किंवा गुंतवणूक केली तरी ती भविष्यासाठी पुरेशी नाही, असे मत ६०टक्के लोकांनी व्यक्त केले आहे.सँडविच जनरेशनची व्याख्या ३५-५४ वर्षे वयोगटातील व्यक्ती म्हणून केली जाते. ही पिढी त्यांचे वृद्ध पालक आणि वाढत्या वयांची मुले अशा दोन पिढ्यांना आर्थिक संरक्षण उपलब्ध करून देतात. जीवन विमा कंपनीने यूगोव्ह च्या सहकार्याने १२ शहरांमधील या पिढीतील ४,००५ प्रतिसादकर्त्यांचे दृष्टिकोन, विश्वास आणि आर्थिक सज्जतेची पातळी समजून घेण्यासाठी सर्वेक्षण केले.एडलवाइज लाइफ इन्शुरन्सचे एमडी आणि सीईओ सुमित राय म्हणाले, गेल्या काही वर्षांत आमच्या ग्राहकांशी झालेल्या संवादातून, सँडविच जनरेशन त्यांचे पालक आणि मुलांची देखभाल करण्याच्या चक्रात कसे जीवन जगत आहेत हे आम्ही बारकाईने पाहिले. 'गरजा' इच्छांच्या मोबदल्यात येत नाहीत असे महत्त्वाकांक्षी जीवन उपलब्ध करताना त्यांना आरोग्यसेवा आणि शिक्षणासारख्या आवश्यक गोष्टी सक्षम करायच्या आहेत. हे प्रामुख्याने त्यांच्या आर्थिक निर्णय घेण्याच्या प्रक्रियेला चालना देते आहे. या प्रक्रियेत, ही सँडविच जनरेशन अनेकदा त्यांची स्वतःची स्वप्नं मागे ढकलते. ज्यामुळे आपण भविष्यासाठी तयार नाही अशी त्यांची धारणा होते.

## 'कल्की २८९८ एडी'वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर

मुंबई : जेव्हा जग अंधारात बुडत आहे, तेव्हा कल्कीचा अवतार आशेचा किरण म्हणून उदयास येतो - एक अवतार वाईटाशी लढण्यासाठी आणि धर्माची पुन्हा रक्षा करण्यासाठी नियतीने नेमलेला. कल्की २८९८ एडी ही भविष्यवाणी प्रत्यक्षात आणतो आणि तिला अश्वत्थामाच्या आख्यायिकेशी जोडतो; अश्वत्थामा एक अमर योद्धा, जो अनंतकाळासाठी पृथ्वीवर चालण्यासाठी शापित होता. अमिताभ बच्चन यांनी ही भूमिका साकारली असून हा चित्रपट सिनेमॅटिकदृष्ट्या आकर्षकपणे उलगडतो, आणि त्यात कधीही न पाहिलेले दृश्ये आणि एक विस्मयकारक जग आहे. या भव्य अनुभवाचे साक्षीदार व्हा 'कल्की २८९८ एडी' च्या वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियरमध्ये रविवार, १६ फेब्रुवारी रोजी रात्री ८ वाजता फक्त झी सिनेमावर.

## एडलवाइज लाईफच्या अभ्यासातून निष्कर्ष समोर

मुंबई: एडलवाइज लाइफ इन्शुरन्सचे एमडी आणि सीईओ सुमित राय म्हणाले, गेल्या काही वर्षांत आमच्या ग्राहकांशी झालेल्या संवादातून, सँडविच जनरेशन त्यांचे पालक आणि मुलांची देखभाल करण्याच्या चक्रात कसे जीवन जगत आहेत हे आम्ही बारकाईने पाहिले. 'गरजा' इच्छांच्या मोबदल्यात येत नाहीत असे महत्त्वाकांक्षी जीवन उपलब्ध करताना त्यांना आरोग्यसेवा आणि शिक्षणासारख्या आवश्यक गोष्टी सक्षम करायच्या आहेत.

# पोलीस अधीक्षकांनी सुरु केलेल्या संवाद ॲपवर मिळालेल्या गोपनिय माहीतीवरुन बीड पोलीसांची गुटख्यावर धडाकेबाज कारवाई

तभा वृत्तसेवा

बीड दि.१३ फेब्रुवारी

पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी जनतेच्या तक्रारी जाणुन घेण्यासाठी सुरु केलेल्या संवाद प्रकल्प अंतर्गत जनतेस देण्यात आलेल्या क्युआर कोडवर दि.१२ फेब्रुवारी रोजी पो.स्टे.परळी ग्रामिण हद्दीत मौजे धर्मापुरी येथील सोमनाथ अशोक फड व बाबुराव श्रीपती मुसळे यांच्याकडे महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला गुटखा/ तंबाखुजन्य पदार्थ असल्याची गोपनिय माहिती मिळाल्याने सदरची माहीती पोलीस अधीक्षक यांनी पो.स्टे.परळी ग्रामिण प्रभारी अधिकारी यांना देऊन कारवाई करण्याचे निर्देश दिले होते.



पोलीस अधीक्षक यांनी दिलेल्या माहितीवरुन प्रभारी अधिकारी पो.स्टे.परळी ग्रामीण यांनी दोन स्वतंत्र पथके तयार करुन मौजे धर्मापुरी येथील सोमनाथ अशोक फड व बाबुराव श्रीपती मुसळे यांचे किराणा दुकानावर व राहते घरी दि.१२ रोजी छापा टाकला असता दोन्ही ठिकाणी मिळून १) शॉट पानमसाला २) नवरतन पान मसाला ३) विमल पान मसाला ४) त-१ तंबाखु ५) जाफरानी तंबाखु व इतर तंबाखुजन्य पदार्थ असा एकुण १३,५०,०००/- रुपये किंमतीचा मुद्येमाल मिळून आल्याने सदरचा मुद्येमाल पो.स्टे.परळी ग्रामीण येथे आणून पुढील योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याकामी अन्न व औषधी प्रशासनास पत्र व्यवहार करण्यात आला असून अन्न व औषधी प्रशासनाच्या तपासणी नंतर गुन्हा दाखल झाला आहे.

सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि मजहर सय्यद, सपोनि समाधान कवडे, पोउपनि अंकुश निमुने, रियाज शेख, पोअं.विष्णु घुगे, पांडुरंग वाले, सुनिल अन्नमवार, तुळशीराम परतवाड, सुंदर केंद्रे, शंकर वाघमारे सर्व नेमणुक पो. स्टे.परळी ग्रामिण यांनी केली आहे.

सदरची कामगिरी ही पोलीस अधीक्षक यांनी सुरु केलेल्या संवाद प्रकल्प ॲपवर मिळालेल्या गोपनिय माहितीवरुन करण्यात आलेली आहे. बीड पोलीस दलातर्फे बीड जिल्हयातील जनतेस अवाहन करण्यात येते की, संवाद प्रकल्प ॲप वर जास्तीत जास्त गोपनिय माहिती द्यावी जेणे करुन अवैध धंद्यावर धडाकेबाज कारवाई करता येईल. माहीती देणाराचे नाव गोपनिय ठेवण्यात येईल.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (३९) प्रार्थना (३)

आशय :- (३) स्वाभिमानी लोकांचे सामूहिक व सुसंघटित जीवन हाच कोणत्याही राष्ट्राचा खरा पाया असतो. तो विस्कटू नये म्हणून आपण परमेश्वर स्वरूप भारत मातेला अजेय शक्ती मागितली. ज्यामुळे आम्ही धर्मपालक व धर्मरक्षक- वीरव्रतधारी बनू. समर्थ रामदास स्वामी म्हणतात समर्थाचिया सेवका वक्र पाहे असा सर्व भूमंडळी कोण आहे.

संघ प्रचारक श्री पालकर म्हणतात.

बलानेच राष्ट्रे वरी नित्य येती। बलानेच स्वातंत्र्य गीतास गाती।
समर्था मिळे मुक्तीचा गोड ठेवा। तरी देश सामर्थ्यशाली करावा ।।

जगात संघर्ष ही एक अनिवार्य बाब आहे. त्यामुळे प्रत्येक हिंदू मध्ये पुरेशी प्रतिकारशक्ती असणे ही एक अत्यंत गरजेची गोष्ट आहे. त्यासाठी शरीर व मन दोघेही दुबळे नको. आम्हाला युद्ध नको. पण युद्ध टाळण्यासाठी समर्थपणे सज्ञ राहणे हाच उपाय आहे. प्रार्थनेचे शेवटचे कडवे संघाचा उद्देश आहे. संघाला अखिल भारतीय हिंदूंचे संघटन करावयाचे आहे. मातृभूमीच्या कल्याणासाठी प्रथम आणि अंतिम उत्तरदायित्व हिंदूंचेच आहे. कोटी कोटी चा हिंदू समाज एक एकटा राहतो; असे होऊ नये म्हणून संघटना हवी. तरच समर्थपणे माझी भारतमाता परम वैभवाकडे नेण्याचा संकल्प पूर्ण होऊ शकेल. त्यासाठी आपण सदाचारी होऊ या. तेव्हा दिशा दिशा मे घूम रहा। अब हिंदू का जयकारा है।

यही सदी हिंदू की होगी। यही समय की धारा है ।।

त्याचे स्वागत समर्थपणे करूया.

।। भारत माता की जय।

नमस्कार

मी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रार्थनेचा अर्थ आणि आशय हे दोन्हीही लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.

अर्थ हा सर्वसामान्यतः प्रचलित आहे तोच घेतला आहे. आशय मात्र मला जसा उमजला तसा लिहिला आहे. या प्रयत्नाबद्दल आपला अभिप्राय कळवल्यास उपकृत होईन. क्रमशः

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

# रेशनकार्ड ई-केवायसी बंधनकारक, नसता अन्नधान्याचा लाभ बंद होणार

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.१३: सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील सर्व पात्र लाभार्थ्यांनी राष्ट्रीय अन सुरक्षा योजने अंतर्गत अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब योजना अंतर्गत शिधापत्रिका धारकांना शासकीय अनुदानित अन्न धान्याचा लाभ सुरु ठेवण्यासाठी कुटुंबातील रेशनकार्ड मध्ये नोंदणी केलेल्या सर्व सदस्यांचे आधार प्रमाणीकरण ई-केवायसी पूर्ण करणे

बंधनकारक आहे. ज्या सदस्यांचे आधार प्रमाणीकरण ई-केवायसी मुदतीत पुर्ण होणार नाही त्यांचा अन्नधान्याचा लाभ बंद होणार आहे.

सर्व पात्र लाभार्थ्यांनी आपल्या गावातील रास्तभाव दुकानदारांशी संपर्क करुन तात्काळ आपले ई-केवायसी पूर्ण करुन घ्यावे. ई-केवायसी करण्यासाठी संबंधित लाभार्थी यांनीरास्तभाव दुकानात समक्ष उपस्थित राहुन ई-पॉस मशीनवर Biometric Authetication (ekyc )

करून पूर्ण करावे. हि प्रकिया दि. २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत पूर्ण करावयाची आहे. ई-केवायसी पूर्ण न केल्याने अन्नधान्याचा लाभ बंद झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधित लाभार्थी यांची राहणार आहे.ए-घधउ साठी आवश्यक लागणारी कागदपत्रे कुटुंबातील सर्व लाभार्थ्यांचे मुळ आधारकार्ड जोडणे बंधनकारक आहे असे पुरवठा निरीक्षण अधिकारी कांचन कांबळे गंगापूरचे

तहसिलदार नवनाथ वगवाड यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे आवाहन केले आहे.

# सोयगाव तालुक्यातील गोंदेगाव येथील इयत्ता दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रम संपन्न

तभा.वृत्तसेवा

सोयगाव दि.१३ फेब्रुवारी

सोयगाव तालुक्यातील गोंदेगाव येथे श्री सरस्वती भुवन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय इयत्ता दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रम दि.८ शनिवार रोजी मोठ्या उत्साहात पार पडला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ.योगेश इंगळे शालेय शिक्षण समिती अध्यक्ष,या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून सोयगाव पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक गणेश झलवार हे उपस्थित होते.या कार्यक्रमाची सुरुवात कार्यक्रमाचे प्रमुख अध्यक्ष तथा प्रमुख अतिथी यांच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन करत सुरुवात करण्यात आली.या कार्यक्रमाप्रसंगी प्रास्ताविक आर.एस.माळी,



मुख्याध्यापक तथा प्राचार्य यांनी केले.या कार्यक्रमात निरोप देत असताना दहावी व बारावीच्या जवळपास १६ विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुखा अतिथी म्हणून लाभलेले सोयगाव पोलीस उपनिरीक्षक गणेश झेलवार यांनी यांच शाळेत शिक्षण घेतले होते. पोलीस उपनिरीक्षक पदावर रुजू झाल्यानंतर पहिल्यांदाच सरस्वती भुवन उच्च माध्यमिक विद्यालयात त्यांनी घेतलेले शिक्षण व तो कटू अनुभव सांगताना विद्यार्थ्यांना एकच सांगितले की आई-वडिलांचे संस्कार गुरुजींनी दिलेले ज्ञान व आपल्या संस्कृतीनुसार आपल्यावर घडत असलेले संस्कार या गोष्टीचा विचार करून आपल्या डोळ्यासमोर आपले उद्दिष्ट ठेवूनच आपण आपले शिक्षणातील महत्त्व जाणत आपल्या उच्च पदापर्यंत मजल गाठण्यासाठी प्रयत्न करावा व कायदेविषयक माहिती विद्यार्थ्यांना त्यांनी पटवून दिली. कार्यक्रमात व्ही.खिरे,बि.ई. महालपुरे,एस.आर.दाभाडे या शिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त करत मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाप्रसंगी सरस्वती भुवन माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय येथील शिक्षक तथा विद्यार्थी यांनी कार्यक्रमासाठी सुरेख अशा पद्धतीने नियोजन केले होते.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं.७०/२०२५

१/- निर्मलाबाई धनराज पाटील, वय ७४ वर्ष, धंदा घरकाम, रा. सोयगाव, ता. सोयगाव, जिल्हा औरंगाबाद. २/- समाधान धनराज पाटील, वय ३३ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ३/- कोकीळाबाई शिवदास पाटील, वय ४८ वर्ष, धंदा घरकाम, रा. वरीलप्रमाणे. ४/- सविता हिलाल पाटील, वय ४५ वर्ष, धंदा घरकाम, रा. वरीलप्रमाणे. ५/- संगीता ईश्वर पाटील, वय ४३ वर्ष, धंदा घरकाम, रा. वरीलप्रमाणे. ६/- सुनंदाबाई किशोर पाटील, वय ३६ वर्ष, धंदा घरकाम, रा. वरीलप्रमाणे. ७/- कल्पना ईश्वर आहेर, वय ३५ वर्ष, धंदा घरकाम, रा. वरीलप्रमाणे.

:: विरुद्धः:

निल

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. सचिन सु. गिरी, सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत धनराज गोबाजी पाटील यांचा दिनांक १०.०७.२०२४ रोजी मौजे सोयगाव, ता. सोयगांव, जि. छ संभाजीनगर येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ ते ७ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते ७ हे मयत धनराज गोबाजी पाटील यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. आजरोजी दिनांक १३/२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पुढील तारीख १७/४/२०२५

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिशक

दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव.

## जाहीर प्रगटन

**मा.पी.बी. पाटील सह दिवाणी न्यायाधीश साहेब, दिवाणी न्यायालय, क. स्तर, गंगापूर, जि. औरंगाबाद**

सिव्हील एम.ए.. क्र. ५९/२०२१.

अर्जदार : सययद हसन सययद महेबुब शहा मार्फत वारस लैलाबी भ्र. सययद हसन शहा वय ५० वर्ष धंदा शेती, रा. शिंगी ता. गंगापुर जि. औरंगाबाद व इतर

विरुध्द

गैरअर्जदार : ४) बिसमील्ला कडु शेख वय ८० वर्ष धंदा घरकाम, रा. खंडाळा कावळेवाडी ता. वैजापुर जि. औरंगाबाद. ५) उमराबी चांद शेख वय सज्ञान धंदा शेती, रा. नागमठाण ता. वैजापुर जि. औरंगाबाद ६) हसनाबी शमशु सययद वय सज्ञान धंदा शेती, रा. भालगाव ता. वैजापुर जि. औरंगाबाद. ७) हमीदा फकीर महंमद वय सज्ञान धंदा शेती, ८) नवाज फकीर महंमद वय सज्ञान धंदा शेती, ९) अन्वर फकीर महंमद वय सज्ञान धंदा शेती, १०) मसुद फकीर महंमद वय सज्ञान धंदा शेती, ११) ताहेराबेगम सरदान खान वय सज्ञान धंदा शेती, १२) साबेराबेगम शा खान वय सज्ञान धंदा शेती १३) सुरयया बेगम हामीद खान वय सज्ञान धंदा शेती, १४) रूख्सानाबेगम एजाज वय सज्ञान धंदा शेती, वरील अ.क्र. ७ ते १४ सर्व रा. बेगमपुरा औरंगाबाद.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मा. सह दिवाणी न्यायाधीश साहेब, दिवाणी न्यायालय क स्तर गंगापुर जि. औरंगाबाद यांच्या न्यायालयात नि.दि.दा.क्र. १९४/२००९ सययद हसन व इतर वि. लालशहा व इतर हा दावा पुर्नजिवीत होणे कामी विधिज्ञ श्री. एस. के. आंबेकर यांच्यामार्फत अर्ज सादर केला आहे म्हणून याव्दारे तुम्हाला ताकीद देण्यात येते की, तारीख २७-०२-२०२५ रोजी मध्यान्ह ११.०० वाजता तुम्ही व अर्जा विरूध्द कारण दाखविण्यासाठी सह दिवाणी न्यायालय क. स्तर, गंगापुर या न्यायालयामध्ये हजर रहावे तसे करण्यास तुम्ही चुकला तर, उक्त अर्जाची एकतर्फी सुनावणी करून निर्णय देण्यात येईल.

आज दिनांक १२-०२-२०२५ रोजी सही व शिक्क्यानिशी जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात येते

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक,

दिवाणी न्यायालय, क.स्तर, गंगापूर,

## जाहीर प्रगटन

**मा. विद्यमान दिवाणी न्यायालय (क. स्तर) सोयगांव यांच्या न्यायालयात.**

किरकोळ दिवाणी अर्ज क्रं. :- २३/२०२५

१/- भागाबाई कडूबा वेल्हारकर, वय ७२ वर्ष, धंदा घरकाम रा. फर्दापूर, ता. सोयगाव, जिल्हा औरंगाबाद. २/- संतोष कडूबा वेल्हारकर, वय ४० वर्ष, धंदा घरकाम रा. वरीलप्रमाणे. ३/- गणेश कडूबा वेल्हारकर, वय ४० वर्ष, धंदा घरकाम रा. वरीलप्रमाणे.

:: विरुद्धः:

निल

प्रकरण :- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबधितास जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. राजेश अ. गिरी, सोयगाव जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत कडूबा दगडूबा वेल्हारकर हे दिनांक ०३.०७.२०२४ रोजी मयत झालेल्या असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क्रं. १ ते ३ हे वारस आहे. असा अर्ज मा. न्यायालयात वकिलामार्फत दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ हे कडूबा दगडूबा वेल्हारकर यांचे वारस असून त्यांना शासकीय / निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरिता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालात योग्य त्या कागदोपत्रा सह. आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. १३/२/२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

पुढील तारीखः-७/३/२०२५

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिशक

दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव.

## जाहीर प्रगटन

**मा. विद्यमान दिवाणी न्यायालय (क. स्तर) सोयगांव यांच्या न्यायालयात.**

किरकोळ दिवाणी अर्ज क्रं. :- ६७/२०२५

१/- आर्या विष्णू गाडेकर, वय १२ वर्ष, अ.पा.क. म्हणून अर्जदार नामे मनीषाबाई विष्णू गाडेकर, रा. सोयगाव, ता. सोयगाव, जिल्हा औरंगाबाद. २/- हर्षल विष्णू गाडेकर, वय १४ वर्ष, अ.पा. क. म्हणून अर्जदार नामे मनीषाबाई विष्णू गाडेकर, रा. वरीलप्रमाणे. ३/- मनीषाबाई विष्णू गाडेकर, वय ३५ वर्ष, धंदा घरकाम, रा. सोयगाव, ता. सोयगाव, जिल्हा औरंगाबाद. ४/- रुखमनबाई दत्तू गाडेकर, वय ६० वर्ष, धंदा घरकाम, रा. वरीलप्रमाणे.

:: विरुद्धः

निल

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबधितास जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. सचिन सु. गिरी, सोयगाव जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत विष्णू दत्तू गाडेकर हे दिनांक ०६.०१.२०२३ रोजी मयत झालेल्या असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क्रं. १ ते ४ हे वारस आहे. असा अर्ज मा. न्यायालयात वकिलामार्फत दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते ४ हे विष्णू दत्तू गाडेकर यांचे वारस असून त्यांना शासकीय / निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरिता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालात योग्य त्या कागदोपत्रा सह. आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. १३/२/२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

पुढील तारीखः-७/४/२०२५

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिशक

दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव.

## जाहीर प्रगटन

**मा. ए. आय. आवटी साहेब दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयात.**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३६७/२०२४

पुढील तारीख २५/०२/२०२५.

अर्जदार : १. उषा भ्र. दत्तात्रय टाक, वय ५९ वर्षे, धंदा घरकाम, रा. भिलपल्टन गल्ली, कन्नड, ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. राहूल पिता दत्तात्रय टाक, वय ३९ वर्षे, धंदा-मजुरी, रा. भिलपल्टन गल्ली, कन्नड, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. शेखर पिता दत्तात्रय टाक, वय ३६ वर्षे, धंदा-मजुरी, रा. भिलपल्टन गल्ली, कन्नड, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४. जयश्री भ्र. प्रकाश कुपटर, वय ४१ वर्षे, धंदा घरकाम, रा. शेवगा, ता. अंबड जि. जालना.

विरुद्ध

गैरअर्जदार :- महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद.

अर्ज :- बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. एम.एच. सय्यद यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे. की, अर्जदार क्र. १ ही मयत दत्तात्रय रखमाजी टाक यांची पत्नी आहे. अर्जदार क्र. २ व ३ हे मयातचे मुले असून अर्जदार क्र. ४ ही मयताची विवाहित मुलगी आहेत. अर्जदार क्रं. २ व ४ हे आपसात सख्खे भाऊ बहिण असून अर्जदार क्र. १ ही त्याची आई आहे. अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत दत्तात्रय रखमाजी टाक यांचे कायदेशीर वारस आहे. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ ते ४ यांचे वडील नामे दत्तात्रय रखमाजी टाक हे दि.१९/०५/२०२१ रोजी मौजे कन्नड येथे वृद्धपकाळामुळे मरण पावले आहे. अर्जदार क्र. १ ते ४ यांना मयत दत्तात्रय रखमाजी टाक यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, नगर पालिका कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, महानगर पालिका, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय व इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार क्रं. १ ते ४ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जदार क्र. १ ते ४ हे व मयत दत्तात्रय रखमाजी टाक हे मौजे कन्नड ता. कन्नड येथील मुळचे रहिवाशी होते तसेच ते कन्नड येथे भिलपल्टन गल्ली, कन्नड येथे राहत असतांना वृद्धपकाळाने मयत झाले आहे. सदरील मयतास अर्जदार क्र. १ ते ४ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दि.०१/११/२०२४ रोजी मौजे कन्नड ता. कन्नड येथे घडले. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक : २७/०१/२०२५.

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिशक

दिवाणी न्यायधीश क. स्तर, कन्नड.

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही.एन. काटकर दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि. किरकोळ अर्ज क्र. १२/२०२५.

पुढील तारीख २८/०२/२०२५.

अर्जदार : १. संतोष इंदरसिंग बेडवाल, वय ४२ वर्षे, धंदा शेती, रा. ब्राम्हणी गराडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. विमल भ्र. वनकर घुशिंगे, वय ४८ वर्षे, धंदा घरकाम, रा. सिरजापुर तांडा, बनशेंद्रा ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. सुलोचना भ्र. बाबुलाल चुंगडे, वय ४७ वर्षे, धंदा घरकाम, रा.बनशेंद्रा ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४. कमलाबाई भ्र. नेहरु महेर, वय ४६ वर्षे, धंदा घरकाम, रा. बोरगाववाडी, ता. सिल्लोड जि. औरंगाबाद. ५. निता भ्र. लक्ष्मण महेर, वय ४४ वर्षे, धंदा घरकाम, रा. भिलदरी पिशोर, रा. कन्नड जि. औरंगाबाद. ६. गिता भ्र. रमेश परदेशी, वय ४१ वर्षे, धंदा घरकाम, रा. परदेश पुरा, येवला, ता. येवला जि. नाशिक.

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद.

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. एम.एच. सय्यद यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्रं. १ हा मयत इंदरसिंग लालसिंग बेडवाल यांचा मुलगा असून अर्जदार क्र. २ ते ६ ह्या मयताच्या विवाहित मुली आहे. अर्जदार क्र. १ ते ६ हे आपसात सख्खे भाऊ बहिण असून अर्जदार क्र. १ ते ६ हे मयत इंदरसिंग लालसिंग बेडवाल यांचे कायदेशीर वारस आहे. अर्जदार क्र. १ ते ६ यांचे वडील नामे इंदरसिंग लालसिंग बेडवाल हे दि.०३/०७/१९९४ रोजी मौजे ब्राम्हणी ता. कन्नड येथे वृद्धपकाळामुळे मरण पावले आहे. तसेच मयताची पत्नी शांताबाई भ्र. इंदरसिंग बेडवाल ही सुद्धा सन १९९२ मध्ये मरण पावलेली आहे. अर्जदार क्रं. १ ते ६ यांना मयत इंदरसिंग लालसिंग बेडवाल यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, नगर पालिका कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, महानगर पालिका, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय व इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार क्रं. १ ते ६ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. मयत इंदरसिंग लालसिंग बेडवाल हे मौजे ब्राम्हणी, ता. कन्नड येथे राहत असतांना वृद्धपकाळाने मयत झाले आहे. सदरील मयतास अर्जदार क्रं. १ ते ६ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दि.०२/१२/२०२४ रोजी मौजे ब्राम्हणी ता. कन्नड येथे घडले. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायलयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याचची नोंद घ्यावी.

दिनांक : २७/०१/२०२५.

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिशक

दिवाणी न्यायधीश क. स्तर, कन्नड.

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती व्ही. एन. काटकर मॅडम, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयातुन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक : ७२/२०२५

पुढील तारीख : १५/०३/२०२५

अर्जदार १-जयश्री भ्र. राहुल राठोड, (लग्नानंतरचे नांव जयश्री पिता सुभाष चव्हाण लग्नापुर्वीचे नांव) वय ३६ वर्षे, धंदा शेती/घरकाम, रा. संभाजी कॉलनी, कॉलेज रोड, कन्नड, ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर २- मयंक पिता राहुल राठोड, वय ०९ वर्षे, धंदा शिक्षण, अज्ञान अ.पा.क. आई अर्जदार क्रमांक १ ३- नव्या पिता राहुल राठोड, वय ०७ वर्षे, धंदा शिक्षण, अज्ञान अ.पा.क. आई अर्जदार क्रमांक १, ४- बाबुसिंग पिता आंबु राठोड, वय ६५ वर्षे, धंदा शेती, रा. संभाजी कॉलनी, कन्नड, ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर ५- मिराबाई भ्र. बाबुसिंग राठोड, वय ५८ वर्षे, धंदा शेती, रा. संभाजी कॉलनी, कन्नड, ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर

- विरुध्द -

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी छ. संभाजीनगर

प्रकरण : कायदेशीर वारसा हक्क प्रमाण पत्र मिळणे बाबत. (Bombay Regulation Act VIII1827, SEC.2)

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकील ॲड. रामदास डी. राऊत यांच्या मार्फत या न्यायालयात अर्जदार नंबर १ ही मयत राहुल पिता बाबुसिंग राठोड यांची पत्नी आहे. अर्जदार क्रमांक २ व ३ हे मयत राहुलचे मुले आहेत. अर्जदार क्रमांक २ व ३ हे आपसात सख्खे भाऊ बहीण असून अर्जदार क्रमांक १ ही त्यांची जन्मदाती आई आहे. अर्जदार क्रमांक ४ व ५ हे मयताचे आई, वडील असून अर्जदार क्रमांक १ चे सासु सासरे आहे व अर्जदार क्रमांक २ व ३ चे आजी आजोबा आहेत, त्यामुळे अर्जदार क्रमांक १ ते ५ हे मयत राहुल पिता बाबुसिंग राठोड याचे कायदेशीर वारस आहेत या व्यतीरिक्त ईतर कुणीही कायदेशीर अथवा बेकायदेशीर वारस नाही. अर्जदार क्रं. १ चे पती व अर्जदार २ व ३ चे वडील व अर्जदार क्रमांक ३ व ४ चा मुलगा नामे मयत राहुल पिता बाबुसिंग राठोड हा ११.०१.२०२५ रोजी मेडीकव्हर हॉस्पीटल सिडको, छ. संभाजीनगर येथे मरण पावले आहे, त्या बाबतचे मयताचे मृत्यु प्रमाण पत्र दिनांक १८.०१.२०२५ रोजीचे छ. संभाजीनगर महानगरपालिका, झोन नं.५ एन-५ सिडको, छ. संभाजीनगर चे अर्जदारांनी या न्यायालयात दाखल केले आहे.. मयत राहुल पिता बाबुसिंग राठोड यांना अर्जदार हेच कायदेशीर वारस असून ज्याची स्पष्टं कल्पना यावी म्हणून नाते संबंधा बाबत तपशिल अर्जदारांनी दिला आहे. अर्जदार क्रमांक १ ते ५ यांना मयत राहूल पिता बाबुसिंग राठोड यांच्या मृत्यु पश्चात सरकारी योजनेचा लाभ मिळणे व अत्यावश्यक सरकारी कामासाठी शासनाच्या शासकीय निमशासकीय कार्यालयात दाखल करण्यासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता असल्यामुळे त्या सर्व कागदपत्राची पुर्तता केली आहे, मा. न्यायालयाच्या वारस प्रमाण पत्राची आवश्यकता असल्यामुळे सदरील प्रकरण मा. न्यायालयात सदरचे प्रकरण दाखल करण्यास दिनांक २५.०१.२०२५ रोजी कारण घडले आहे. सबब वरील प्रमाणे वारस प्रमाण पत्र मिळण्याची अर्जदार हे या न्यायालयात मागणी करीत आहे.

त्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटना व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे. सबब या जाहीर प्रगटना व्दारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्वी ईतर कुणासही आक्षेप / उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन वर्तमान पत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर वकीला मार्फत हजर व्हावे तसे न केल्यास मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारसा हक्क प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल.

सबब आज दिनांक ०७.०२.२०२५ रोजी माझे सहीनिशी व मा. कोर्टाचे शिक्यानिशी दिले.

दिनांक : ०७.०२.२०२५

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिशक

दिवाणी न्यायधीश क. स्तर, कन्नड.

# माजी आमदार मोहन हंबर्डे राष्ट्रवादीत

## उप मुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थित २८ फेब्रुवारी रोजी प्रवेश सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १३ फेब्रुवारी**

काँग्रसचे माजी आ. मोहन हंबर्डे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करणार असून दि. २८ फेब्रुवारी रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश सोहळा होणार असल्याची माहिती आ. प्रताप पाटीत चिखलीकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.



या पत्रकार परिषदेस माजी आ. मोहन हंबर्डे, राष्ट्रवादीचे मोहसीनखान पठाण, शिवराज पाटील होटाळकर, वसंत सुगावे, माधव पावडे यांची उपस्थिती होती.

विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर नांदेड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे संघटन वाढविण्याचा प्रयत्न सुरू आहे. मागील दोन महिन्याच्या कालावधीत माजी आ. अविनाश घाटे, माजी सभापती व्यकंट पाटील गोजेगावकर, कल्याण सुर्यवंशी, माधव पावडे यांच्यासह अनेकांनी राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये प्रवेश केला आहे. तर दि. २८ फेब्रुवारी रोजी शहरातील ओम गार्डन येथे उप मुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत माजी आ. मोहन अण्णा हंबर्डे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करणार आहेत. त्यांच्यासोबत माजी जिल्हा परिषद सदस्य, माजी नगरसेवक, सरपंच, उपसरपंच हे देखील राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करणार आहेत. माजी आ. मोहन हंबर्डे यांच्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसला बळकटी मिळणार असून त्यांच्या या निर्णयाचे स्वागत असल्याचेही आ. प्रताप पाटील चिखलीकर यावेळी म्हणाले.

**निर्णय घेण्याचे अधिकार केवळ महायूतीलाच**

भारतीय जनता पार्टी, शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील तिन्ही नेते मिळून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडुकी बाबतचा निर्णय घेणार आहेत. निवडणुका स्वबळावर लढवायच्या की नाही याचा निर्णय घेण्याचा अधिकार कुठल्याही एका जिल्ह्यातील नेत्याला नसून हा निर्णय महायुतीचे वरिष्ट नेते घेणार असल्याचे प्रताप पाटील चिखलीकर यांनी स्पष्ट केले.

# मस्जिदीच्या ईनामी जमिनीवर अतिक्रमण करणा-या शौकतबेग सह २६ जणांवर गुन्हा दाखल



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १३ फेब्रुवारी**

बिलोली येथील बहुचर्चित हजरत नवाब सरफराजखान मखबरा झुंजागन नगारखाना कब्रस्तान दर्गा व मस्जिद च्या लगत वक्फ बोर्डाच्या च्या ईनामी जमिनिवर अनधिकृतपणे अतिक्रमण करुन त्या जागेचे बनावट दस्तावेज,बाण्ड व सौदाचिठ्ठी करुन दुस-याना भाड्याने देऊन शासनाचे लाखो रुपये गिळंकृत करणा-या स्वंयघोषित व तात्पुरते मुतवल्ली मिर्झा शौकत बेग महेमुद बेग,अजीज बेग अमजत बेग,अजमत बेग आबीद बेग यांच्यासह अन्य २४ अतिक्रमणधारकांवर माहिती अधिकार संरक्षण समितीचे अध्यक्ष शेख जाकिर शेख सगीर यांच्या फिर्यादीवरुन दि.१३ फेब्रुवारी २०२५ रोजी बिलोली पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बिलोली येथील पुरातत्व विभागाची ऐतिहासिक व राज्य संरक्षित ईमारत असलेल्या शहिद हजरत नवाब सरफराज खान मकबरा झुजागन नगारखाना व मस्जिद आहे.सदरील ऐतिहासिक मस्जिद हि पूर्णतः दगडात कोरली असल्याने सदरील मस्जिद पहाण्यासाठी आंध्र, तेलंगणा, कर्नाटका व महाराष्ट्रातील पर्यटक मोठ्या प्रमाणात येत असतात.या ऐतिहासिक वास्तु लगत सर्वे क्र.५७७,५८० या महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या ईनामी जमिन दर्गाचे मुतवल्ली स्वंयघोषित तात्पुरते मुतवल्ली मिर्झा शौकत बेग महेमुद बेग हे आहेत. शौकत बेग व ईतरांनी बेकायदेशिरपणे सदरिल जमिनीचे सौदाचिठ्ठी,बाण्डवर करार करुन देऊन या जागेवर शादी खाना यासह मोठ्या प्रमाणात दुकाने थाटुन त्या दुकानाच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षापासून शासनाची व वक्फ बोर्डाची लाखो रुपये गिळंकृत करीत आहेत. या परिसरात टिन पत्र्याचे दुकाने थाटल्याने ऐतिहासिक मस्जिद पूर्णतः झाकून गेली आहे. परिणामी मस्जिदीचे सौंदर्य कमी झाले आहे. त्यामुळे याकडे पर्यटकांनी पाठ फिरवली असून यामुळे ऐतिहासिक मस्जिदीचे अस्तित्व धोक्यात आले आहे.

मस्जिद परिसरातील जागेवर शादी खाना यासह मोठ्या प्रमाणात दुकाने थाटुन त्या दुकानाच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षापासून शासनाची व वक्फ बोर्डाची लाखो रुपये गिळंकृत करणा-या ईनामदारावर कारवाई करुन गुन्हा दाखल करण्यासाठी माहिती अधिकार संरक्षण समितीचे संस्थापक अध्यक्ष शेख जाकिर यांनी ऍ़ड.ईद्रीस कादरी यांच्या मार्फत १५६(३)ओएमसीए २०३/२३ नुसार न्यायालयात परवानगी मागितली होती.त्यानुसार बिलोली येथील कनिष्ठ स्तर प्रथम न्यायालयाने तात्पुरते मुतवल्ली मिर्झा शौकत बेग व ईतर २६ अतिक्रमणधारकांवर ४०६, ४२०, ४६७, ४६८, ४७१, १२०ब, ३४ या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**मस्जिद परिसराला गतवैभव मिळण्यासाठी प्रयत्न करणार : शेख जाकीर**

बिलोली येथील मस्जिद परिसरातील टिन पत्र्याने उभारण्यात आलेले शौकत फंक्शन हॉल व दुकाने पाडून या ठिकाणी सर्व सुविधायुक्त गार्डन उभारल्यास येथे पर्यटन स्थळ निर्माण होईल व मस्जिद परिसराला सौंदर्य लाभून बिलोली शहराला व मस्जिदीला गतवैभव निर्माण होईल. यासाठी मि शासन स्तरावर प्रयत्न करणार आहे.

## संक्षिप्त वृत्त



### बारडच्या मुलींच एनएमएमएसमध्ये अव्वल जि.प. शाळेच्या २६ विद्यार्थी उत्तीर्ण

**मुदखेड**-बारडच्या मुलींचं एनएमएमएस मध्ये अव्वल स्थानावर असुन २६ उत्तीर्ण विद्यार्थ्यांमध्ये २२ मुलींनी परीक्षेत यश संपादन करून आम्हीच अव्वल असल्याचे सिद्ध केले आहे बारड जिल्हा परिषद हायस्कूल शाळेचा एनएमएमएस परीक्षेचा निकाल हाती आला असुन मुलींनी बाजी मारली आहे. केंद्र शासनाच्या वतीने विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची आवड निर्माण होण्यासाठी एनएमएमएस पॅटर्न राबवत आहे एमपीएससीच्या धर्तीवर स्पर्धा परीक्षां पेपर विद्यार्थ्यांना आठवीच्या वर्गात सोडवायला मिळत असल्याने पुढील स्पर्धा परीक्षेचे आव्हान कसे झेलावे यातून त्यांना योग्य मार्गदर्शन मिळत आहे त्यामुळे विद्यार्थ्यांचे बौद्धिक क्षमता वाढत असून स्पर्धा परीक्षेला सामोरे जाण्यास सक्षम पर्याय मिळत आहे. एन एम एम एस मध्ये रँक मध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांना शासन स्तरावरून वर्षाला १२ हजार रुपये स्कॉलरशिप मिळत असून तोही लाभ विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणा साठी उपयोगी ठरत आहे. बारड जिल्हा परिषद हायस्कूल, केंद्रीय कन्या शाळा या दोन्ही शाळांनी विद्यार्थी गुणवत्ता टिकून ठेवली असून पुन्हा एकदा गुणवत्तेत उच्चांक असल्याचे दाखवून दिले. यावेळी एनएमएमएस मध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे दोन्ही शाळा कडून स्वागत करण्यात आले असून विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला आहे ग्रामस्थांकडून उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात येत आहे. परंतु यामध्ये मुलापेक्षा मुलींच अव्वल असल्याची चर्चा ग्रामस्थांन कडून होत आहे. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी मु.अ.अंजली तळणकर,मु.अ.संजय माहुरकर, शिक्षक प्रसाद जाधव, संतोष राऊत,आबांड, श्रीपाद बोरीकर, आदींनी परिश्रम घेतले. गुणवत्तेत झेप घेणाऱ्या जिल्हा परिषद शाळांना केंद्र शासनाच्या पीएम श्री योजनेमध्ये समाविष्ट करून विद्यार्थी विकासांना चालना मिळवून देण्याची मागणी बारडवासीयाकडून करण्यात येत आहे

### तलाठी सचिन भालेराव यांची मंडळ अधिकारी म्हणून पदोन्नती

**नवीन नांदेड**-नवीन नांदेड सिडको परिसरातील गोपाळचावडी ता.जि. नांदेड येथील तलाठी सज्जाचे तलाठी सचिन ग्यानोबा भालेराव यांची मंडळ अधिकारी म्हणून इस्लापूर, तहसील कार्यालय किनवट येथे पदोन्नती झाली आहे. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई कडील मूळ अर्जामधील आदेशानुसार तलाठी संवर्गाची अंतिम सुधारित जष्ठता अधिसूचनानुसार विभागीय पदोन्नती समिती बैठकीच्या कार्यवृतांत आदेशानुसार नांदेड जिल्हा महसूल आस्थापनेवरील तलाठी संवर्गातून मंडळ अधिकारी संवर्गात पदोन्नती देण्यासाठी दिनांक ४ ऑक्टोंबर २०२४ रोजी विभागीय समितीच्या बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये तलाठी संवर्गातून मंडळ अधिकारी संवर्गात पदोन्नती देण्यासाठी संवर्गातील कर्मचारी सचिन ग्यानोबा भालेराव तलाठी सज्जा गोपाळ चावडी यांची निवड नांदेड येथील तत्कालीन जिल्हाधिकारी अभिजित राउत यांच्या आदेशानुसार तलाठी यांचे मंडळ अधिकारी म्हणून सेवा जेष्ठतेनुसार पदोन्नती झाल्याबद्दल गोपाळ चावडी येथील ग्रामपंचायत सदस्य प्रतिनिधी रमेश तालीमकर,सामाजिक कार्यकर्ते किशनराव धुमाळ, पत्रकार संजय निळेकर,प्रल्हाद अंतापुरकर, सुबोध वडगावकर तसेच गोपाळ चावडी, बाभुळगाव येतील सामाजिक, राजकीय कार्यकर्ते व शेतकरी यांनी सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.



# लिलावातील वाळू विक्रीचा नागरिकांनी लाभ घ्यावा : तहसीलदार किशोर यादव

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. १३ फेब्रुवारी**

नुकतेच रुजू झालेले जिल्हाधिकारी राहुल कर्डिले,सहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली यांच्या मार्गदर्शनाखाली माहूरचे तहसीलदार किशोर यादव यांनी ९ महिन्यांमध्ये धडाकेबाज कारवाया करत वाळू चोरी करणारी तब्बल ३३ वाहने जप्त करून त्या माध्यमातून लाखोंचा दंड वसूल करत शासनाच्या तिजोरीत जमा केला असून ,यामुळे वाळू चोरी शून्यावर आली आहे. वाळू तस्करांनी जमा केलेल्या नदी काठावरील जप्त वाळू साठ्यांचा लिलाव करून वाळू विक्री चोले पेंड आणि पडसा या ठिकाणी दिनांक १३ फेब्रुवारी पासून सुरू करण्यात आल्याने नागरिकांनी स्वस्त दराने होत असलेल्या या वाळू विक्रीचा लाभ घ्यावा! असे आवाहन तहसीलदार किशोर यादव यांनी केले आहे.



शासनाकडून वाळू घाटांच्या हराशींचे कार्य विचाराधीन असून यामुळे मात्र घरकुल धारक व गोरगरिबांना स्वस्त वाळू मिळणे दुरापास्त झाले होते. त्यामुळे तहसीलदार किशोर यादव यांनी वाळू तस्करांनी नदीपत्रावर वाळू चोरीच्या उद्देशाने जमा केलेल्या वाळूची जप्ती करून या जप्त वाळूचा गोरगरिबांना फायदा व्हावा यासाठी सहायक जिल्हाधिकारी मेघना कावली यांच्याकडे प्रस्ताव पाठवले. या दरम्यान पोटदुख्यांकडून चुकीच्या वावड्या उठवल्या जात होत्या. त्यामुळे गोरगरीब तथा घरकुलधारकांचा विचार करून सहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली यांनी तात्काळ लिलाव जाहीर करून जप्ती घेणाऱ्यांना वाळूचे लिलावात बोली मंजूर करून त्यांना स्वस्त दरात गोरगरिबांना वाळू विक्री करण्याचे आदेश दिल्याने चोले पेंड आणि पडसा या ठिकाणी गुरुवार १३ फेब्रुवारी पासून स्वस्तात वाळू विक्री सुरू करण्यात आली आहे.

# कौशल्य आधारित प्लंबिंग टेक्निशियन प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**बा-हाळी,दि. १३ फेब्रुवारी**

संस्कृती संवर्धन मंडळ सगरोळी प्रथम एज्युकेशन फाउंडेशन मुंबई व विद्या विकास विद्यालय बा-हाळी यांच्या संयुक्त विद्यमाने बा-हाळी येथे दहावी पास विद्यार्थ्यांसाठी कौशल्य आधारित अनिवासी प्लंबिंग टेक्निशियन प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन करण्यात आले .

एक महिना चालणाऱ्या या अनिवासी प्रशिक्षण वर्गाच्या शिबिर उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मल्हारराव देशपांडे ,तर प्रमुख पाहुणे म्हणून ऍ़ड.मुरारजी देशपांडे ,राजण देशपांडे ,श्रद्धाताई देशमुख (संचालिका ,सांस्कृतिक संवर्धन मंडळ )माधुरी रेवनवार ,संतोष गुंजवटे (प्रथम फाउंडेशन) ओंकार दळवी उपस्थित होते. प्रास्ताविकात अँड. मुरारजी देशपांडे यांनी ग्रामीण भागातील तरुणांनी आता रोजगारावर लक्ष केंद्रित करण्यासाठी कौशल्यावर आधारित प्रशिक्षण वर्गाचा लाभ घ्यावा ग्रामीण व शहरी भागात कुशल कामगारांचा तुटवडा आहे कौशल्यावर भर दिल्यास शहरी भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत .या शिबिरातील विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, तेव्हा या प्लंबिंग अनिवासी वर्गाचा लाभ घेण्याचे आवाहनही त्यांनी केले .

# दासनवमी पारायण उत्सवास प्रारंभ !

**तभा वृत्तसेवा**
**धर्माबाद ,दि. १३ फेब्रुवारी**

येथील श्रीराम मंदिर येथे दासनवमी पारायण उत्सव ची मोठ्या उत्साहात प्रारंभ झाली आसल्याची माहिती श्रीराम मंदिर देवस्थान चे मुख्य सौ. पुष्पाबाई आणि श्री. श्रीनीवासराव रत्नाळीकर यांनी उपोरोक्त प्रतिनिधीशी बोलताना सांगितले. दरवर्षी प्रमाणे या वर्षी ही श्रीराम मंदीर, धर्माबाद येथे दासनवमी उत्सवा निमित्त दि. १३-०२-२०२५ माघ कृष्ण १ रोजी श्रीमद् दासबोध ग्रंथाचे पारायण सुरू झाले. या पारायणात ३० भक्तांनी नियोजित पाहिले दोन दशका चे वाचन करून आपला सहभाग नोंदवला.

# महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा दौरा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १३ फेब्रुवारी**



राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे नांदेड दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढील प्रमाणे राहिल. शुक्रवार १४ फेब्रुवारी २०२५ रोजी नागपूर येथून विमानाने सकाळी ९.२०वा. नांदेड विमानतळ येथे आगमन. सकाळी ९.२५ वा.मोटारीने भक्ती लॉन्स, मालेगाव रोड, तरोडा खुर्द नांदेडकडे प्रयाण. सकाळी ९.५० वा. भक्ती लॉन्स, नांदेड . दुपारी १.३० वा. विमानाने नांदेडहून छत्रपती संभाजीनगर कडे प्रयाण करतील.

# राष्ट्रीय सेवा योजना शिबीराचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**मुखेड,दि. १३ फेब्रुवारी**

येथील वीरभद्र शिक्षण संस्था संचलित महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष वार्षिक युवक शिबीर मौजे बेरळी खु.येथे अतिशय थाटात उद्घाटन संपन्न झाला . प्रस्तुत शिबीर दि.०९ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे . उद्घाटन दि.१० फेब्रुवारी रोजी घेण्यात आले .राष्ट्रीय सेवा योजना ही सामाजिक जबाबदारी स्वीकारुन समर्पित भावना जपणारे व्यासपीठ आहे . वर्तमान काळात अनेक संधी युवकांना उपलब्ध आहेत . या संधीचे सोने करण्यासाठी आपल्या मनात ईच्छा असणे महत्त्वाचे आहे . राष्ट्रीय सेवा योजना शिबीरातून स्वयंसेवकांना कर्तृत्ववान बनण्यासाठी मोलाची मदत मिळते असे प्रतिपादन संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी यांनी प्रतिपादन केले .

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वीरभद्र शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष ओंकारअप्पा मठपती , उद्घाटक नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक मल्लिकार्जुन करजगी , प्रमुख पाहुणे धर्माबादच्या लालबहादूर शास्त्री महाविद्यालयाचे रसायनशास्त्र विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. शिवाजीराव पटवारी , विभागीय समन्वयक प्रा.संजीव डोईबळे , धर्माबादच्या लालबहादूर शास्त्री महाविद्यालयाचे रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. संभाजी मनुरकर , मज्योफुले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.बी.अडकिणे , व्यासपीठावर जि.प.शाळेचे मुख्याध्यापिका सौ.के.ए.सय्यद , सहशिक्षक जगन्नाथ राठोड , थगनारे उपस्थित होते . प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. चंद्रकांत एकलारे , सूत्रसंचालन स्वयंसेविका कु.निकिता पवळे व कु.ऋतुजा डाकळे यांनी केले .

# शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण प्रारंभ

**देगलूर,दि. १३ फेब्रुवारी**

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था नांदेड मार्फत स्टार्स व समग्र शिक्षा अभियान अंतर्गत प्राथमिक, उच्च प्राथमिक व माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांचे पाच दिवसीय शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण २.० या प्रशिक्षणास दि. ११ फेब्रुवारी रोजी सुरुवात झाली असून सदरील प्रशिक्षण १५ फेब्रुवारी पर्यंत चालणार आहे.

या वेळी देगलूर तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी कृष्णा तोटावार ,शिक्षण विस्तार अधिकारी तथा प्रशिक्षणाचे मार्गदर्शक झम्पलवाड, केंद्रप्रमुख डी. एम. पांचाळ, तंत्रस्नेही शिक्षक अनिल दुगाने, जेष्ठ सुलभक नाईक आदी उपस्थित होते. राष्ट्रीय शिक्षण धोरण - २०२० आंतर्गत महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे या संस्थेमार्फत शैक्षणिक गुणवत्ता वृद्धिंगत करण्यासाठी राज्यातील शिक्षकांचे क्षमता वृद्धी करण्यासाठी तालुकास्तरीय शिक्षक प्रशिक्षण जिल्हा परिषद माध्यमिक कन्या विद्यालय देगलूर येथे आयोजन करण्यात आले आहे. तालुक्यातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक विद्यालयाचे अनेक प्रशिक्षक प्रशिक्षण घेत आहे . सदरील प्रशिक्षणात राष्ट्रीय शिक्षण धोरण, राज्य अभ्यासक्रम आराखडा पायाभूत आणि शालेय स्तर, शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा, क्षमता आधारित अध्ययन-अध्यापन प्रक्रिया, प्रश्ननिर्मिती कौशल्य, विद्यार्थ्यांचे समग्र प्रगतीपत्रक याविषयी सखोल माहिती सुलभकाकडून देण्यात येणार आहे. जिल्हा स्तरावर प्रशिक्षण घेतलेले सुलभक शिक्षकांना मार्गदर्शन करत आहेत.

# किनवट येथे १५ आणि १६ फेब्रुवारी रोजी जागतिक बौद्ध धम्म परिषद

**तभा वृत्तसेवा**
**किनवट ,दि. १३ फेब्रुवारी**

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी समता नगर येथील बौद्धमूर्ती परिसरात दि १५ व १६ असे दोन दिवस १४ व्या जागतिक बौद्ध धम्म परिषदेचे भव्य स्वरूपात आयोजन केले असून या परिषदेला देश-विदेशातील भन्ते,भाबौमसचे कार्याध्यक्ष भीमराव आंबेडकर,सामाजिक न्यायमंत्री संजय सिरसाठ, आ. भीमराव केराम आमदार हेमंत पाटील, मंत्री इंद्रनील नाईक उपस्थित राहणार आहेत. यानिमित्त रात्री ९ वा.ख्यातनाम गायक अजय देहाडे मंजुषा शिंदे भाग्यश्री इंगळे संविधान मनोहरे रेश्मा सोनवणे यांचा बुद्ध भीम गीतांचा प्रबोधनात्मक कार्यक्रम होणार आहे या धम्म परिषदेला पंचक्रोशीतील नागरिकांनी हजारोच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संयोजक दया भाऊ पाटील, निमंत्रक विशाल हलवले यांनी केले आहे.



दिनांक १५ फेब्रुवारी रोजी दु.४ वा.भारतीय बौद्ध महासभेचे कार्याध्यक्ष भीमराव आंबेडकर यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन होईल राष्ट्रीय अध्यक्ष जोगेंद्र कवाडे,प्रा डॉ मोहन मोरे दराटीकर,बापूराव गजभारे, विनोद भरणे मिलिंद धुळे मारोती भगत हे उपस्थिती राहतील. सायं ६ते रात्री ८ वाजेपर्यंत धम्मदेशना, धम्मकवी संमेलन व धम्म संवाद कार्यक्रम संपन्न होतील रात्री ९ वा धम्म संस्कृतिक संध्या कार्यक्रमात महाराष्ट्राच्या नामांकित गायिका रेश्मा सोनवणे संविधान मनोहरे व प्रशांत दामोदर यांचा बुद्ध भीम गीतांचा दणदणीत कार्यक्रम होईल. १६ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११ वा. धम्म सवाल, १२ वा भदंत संघरत्न महाथेरो हे धम्मदेशनात देतील.त्यानंतर धम्मसंगती प्रबोधन स्पर्धा होणार असून यात १२ ते २० वर्षे वयोगटातील मुला मुलींना सहभागी होता येईल.

# इस्लापूर येथील जलजिवनच्या कामाकडे जिल्हाधिकाऱ्यांनी वैयक्तिक लक्ष देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**इस्लापूर,दि. १३ फेब्रुवारी**

इस्लापूर येथील जलजिवन मिशन अंतर्गत चालू असलेल्या पाणी पुरवठा योजनेच्या कामात मोठी अनियमितता असून काम अर्धवट असताना ठेकेदाराकडून नळ कनेक्शन देण्याची घाई का? केली जात आहे. हे न समजणारे कोडेच ठरले आहे. आता उन्हाळ्याच्या प्रारंभावर तिव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून पैनगंगेतच पाणी नसल्याने नळाला कुठून येणार हा साधा प्रश्न ठेकेदारांना का? समजत नसेल असा प्रश्न गावकऱ्यांतून उपस्थित केला जात आहे.

इस्लापूर येथील पाणीटंचाई चा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी शासनाकडून कोट्यावधी रूपयांचा विकास निधी मंजूर झाला. गावकऱ्यांत मात्र तेव्हा समाधान होते. परंतू या कामांच्या ठेकेदाराने मनमानी पद्धतीने काम अतिशय निकृष्ट दर्जाचे केले असून, अर्धवट अवस्थेत काम असताना कनेक्शन देण्याचीच घाई केली जात आहे. पाईपलाईन करण्यासाठी गावातील अंतर्गत रस्ते खोदून ठेवले. त्या खराब

**योजनेची कामे अर्धवटच**



रस्त्यावर पायी चालणे ही अवघड होवून बसले आहे. पावसाळ्यात चिखलाचे साम्राज्य पसरले. आता उन्हाळ्यात धुळीचा त्रास सहन करावा लागत आहे. हवेने धुळ उडून नागरिकांच्या नाका तोंडात जात असल्याने अनेकांना घश्याचा त्रास जाणवत आहे. तर अनेकांना धुळीमुळे गंभीर आजार उद्भवत आहेत. ठेकेदार हे प्राधिकरण विभागाच्या शाखा अभियंत्यापासून ते चक्क कार्यकारी अभियंता, इतकेच नव्हे तर अधिक्षक अभियंत्याला मॅनेज केल्यामुळे की काय? ठेकेदाराच्या मनमानीला चाप लावण्याची कुणीच तसदी घेत नाहीत. आता उन्हाळ्याच्या प्रारंभावर इस्लापूर येथे पाणीटंचाई च्या झळा अधिक तिव्रतेने जाणवत आहेत. परंतू लाखो रूपये निधी खर्च होऊनही इस्लापूर ला पाणी मिळत नसल्याने नागरिकांतून तीव्र संताप व्यक्त होत आहे. हे इथे विषेश असून शासनाच्या निधीची विल्हेवाट लावणारे मात्र सध्या मोकाटच आहेत.

परीसरात व इस्लापूर येथे चालू असलेले जल जीवन मशीन चे कामे कुठे अर्धवट तर कुठे बोगस होत आहेत या बाबीकडे नव्याने आलेले जिल्हाधिकारी कर्डिले साहेब यांनी विशेष लक्ष दिल्यास बोगस व अर्धवट होणारे कामे चांगल्या दर्जाची होतील त्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे अशीही मागणी होत आहे.

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस व हितसंबंधीतास या जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार नामे अब्दुल खादर पि. मोहम्मद अब्दुल हाफिज रा. खडकपुरा, ता. जि. नांदेड यांनी दिलेल्या अधिकार व माहितीनुसार सर्व जनतेस व संबंधीतास सुचित करण्यात येते की,

हे की, माझे पक्षकार यांच्या नावे मौजे म्हाळजा सर्व्हे नं. ६, गॅलक्सी पार्क मधील प्लॉट क्र. ए/२ व ए/३ स्थित म्हाळजा माळटेकडी रोड ता. जि. नांदेड येथील दोन प्लॉट असुन, ते दोन प्लॉट तुम्ही दि. १०.०२.२०२२ रोजी माझे पक्षकाराकडुन खरेदी करण्याचा सौदाचिठ्ठी करारनामा केला होता त्या नुसार ठरलेल्या अटी व शर्तीची पुर्तता केलेली नाही व राहीलेली रक्कम सुध्दा दिलेली नाही व सदरील करारनामा / सौदाचिठ्ठी ही मुदतीत होती व सौदाचिठ्ठी / करारनामा नुसार राहीलेली रक्कम देवून रजिस्ट्री करुन घेण्याचे ठरले होते. परंतु तुम्ही आज तारखे पर्यंत माझे पक्षकाराशी संपर्क साधला नाही व माझे पक्षकारांनी वारंवार तोंडी सांगुन व अनेकदा माणसाला पाठवुन सुध्दा तुम्ही प्लॉटचा व्यवहार करण्यास टाळत आहात असे दिसुन येते. त्यामुळे माझे पक्षकारांचे अतोनात नुकसान होत आहे. त्यामुळे माझे पक्षकार यांनी दि. २६.०१.२०२५ रोजी दोन वृत्तपत्र दै. लोकमत व दै. तरुण भारत या पेपरमध्ये सौदाचिठ्ठी रद्द करण्या बाबतचे जाहीर प्रगटन दिले आहे, सदरील जाहीर प्रगटन दोन्ही पेपरमध्ये प्रसिध्द झाले आहे. तरी तुमच्याकडुन कोणत्याच प्रकारचा प्रतिसाद मिळाला नाही.

हे की, त्यामुळे माझे पक्षकार यांनी तुम्हाला दि. ०७.०२.२०२५ रोजी त्यांच्या वकीला मार्फत नोटीस पाठविली होती, सदरील नोटीस तुम्हाला दि. ०८.०२.२०२५ रोजी प्राप्त झाली परंतु तुम्ही सदरील नोटीस घेण्यास नकार दिला, त्यामुळे सदरील नोटीस ही आमचे पक्षकाराकडे परत आली. त्यामुळे आपणास ही दुसरी नाटीस पाठविण्यात येत आहे. तरी अदयाप पर्यंत तुम्ही माझे पक्षकाराशी संपर्क साधला नाही. व टरलेल्या सौदाचिठ्ठी /करारनाम्यानुसार प्लॉटचा व्यवहार पण केला नाही, त्यामुळे तुमचे सदरील प्लॉट बाबतचे संपूर्ण अधिकार संपुष्ठात आले आहेत व सौदाचिठ्ठी नुसार मुदतीत तुम्ही व्यवहार / करार पुर्ण केला नाही त्यामुळे तुमचा करार हा भारतीय करार कायदा नुसार अवैध स्वरुपाचा आहे व आज रोजी माझे पक्षकार सदरील दोन्ही प्लॉट दुसऱ्यांना विक्री करतील याची नोंद घ्यावी व होणाऱ्या परिणामास तुम्ही स्वतः जबाबदार रहाल. व माझे पक्षकार तुमच्या विरोधामध्ये दिवाणी व फौजदारी स्वरुपाची कार्यवाही करतील याची नोंद घ्यावी.

करीता सबब हे जाहीर प्रगटन,

**मार्फत,**
**ॲड. विकास वाघमारे, नांदेड**

**जाहीर प्रगटन देणार**
**अब्दुल खादर पि. मोहम्मद अब्दुल हाफिज**
**रा. खडकपुरा, ता. जि. नांदेड**
**मो. नं.**





सिरसदेवी (ता. गेवराई) येथील अर्जुन शिंदे यांच्या शिवारात वेलीला असे टोमॅटो लगडले आहेत. (छाया कृष्णा शिंदे)

# माजी मुख्याध्यापिका श्रीमती विजयाताई क्षीरसागर यांची ग्रंथतुला ; पुस्तक प्रकाशन सोहळा

### लेकीनं आईसाठी पुढाकार घेणं कौतुकास्पद - लेखिका विजया मारोतकर



अंबाजोगाई (त भा वृत्तसेवा) –येथील जिल्हा परिषद शाळेच्या निवृत्त मुख्याध्यापिका श्रीमती विजयाताई सुधाकर क्षीरसागर यांच्या तीन लेकीनं प्रकाशित केलेल्या कविता संग्रहाच्या माध्यमातून समर्पित भाव ज्याला नात्याच्या रेशमी धाग्याने गुंफताना मातृत्वाची ग्रंथ तुला करून समाजात आदर्श प्रस्थापित केला. ते खर्या अर्थाने कौतुकास्पद म्हणावे लागेल. मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त झाल्याने तिच्याकडे बघण्याचा वेगळा आयाम तयार झाल. कविता ताजी असेल तरच वाचकांना आवडते. त्या दृष्टीने कवी मनाने विचार करायला हवा. कवितेच्या रचनेतून सामाजिक मन आणि जबाबदारीची जाणिव करून देता येते असे प्रतिपादन नागपूर येथील प्रसिद्ध लेखिका विजया मारोतकर यांनी केले.

सौ.अपर्णा कुलकर्णी, आश्विनी निवर्गी आणि प्रा.डॉ.सीमा पांडे या भगिनींनी स्वयंरचित केलेल्या कविता संग्रहाच्या पुस्तकाचे प्रकाशन सौभाग्य मंगल कार्यालयात नुकतेच संपन्न झाले. विशेष म्हणजे त्याच ग्रंथ पुस्तिकांनी त्यांच्या आईची ग्रंथ तुला करण्यात आली. व्यासपीठावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.सुरेश खुरसाळे, जेष्ठ साहित्यिक माजी प्राचार्य वेदकुमार वेदालंकार, सुनिता देशमुख यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक करताना प्रा.सीमा पांडे यांनी या उपक्रमामागची पुर्वपिठीका सांगून मातृसंस्थेविषयी असलेले दायित्व लेकी म्हणून तो जोपासण्याचा आम्ही छोटासा प्रयत्न केल्याचे त्यांनी सांगितले. याच कार्यक्रमात अश्विनी निवर्गी लिखित 'वनोद्वारी', 'सेवाव्रती मेजर' या पुस्तकाचे ही प्रकाशन करून प्रा.एस.पी.कुलकर्णी यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. ८५ वर्षांच्या विजयाताई क्षीरसागर यांना त्यांच्या लेकीनं केलेल्या कौतुकाचा आनंदाने स्विकार करताना डोळ्यांतले आश्रु रोखता आले नाहीत. याचि देहि, याचि डोळा लेकरं, लेकी लेखक झाल्या, त्यांनीच संपादित ग्रंथ संपदा ज्या तराजूत मला तोलल्या गेलं यापेक्षा आयुष्यातला आनंद दुसरा असु शकत नाही. पण, याप्रसंगी स्व.प्रा.सुधाकरराव (पती) नसल्याची खंत त्यांना जाणवली. सौ.अपर्णा कुलकर्णी यांनी तर नात्याचे रेशमी बंध यावर आधारित स्वत:च्या जीवनात माहेरी आणि सासरी आलेल्या प्रत्येक नातेवाईकांच्या भुमिकेचं कवितेच्या माध्यमातून रेखाटन केलं. ज्याचं नांव नात्याचे रेशमी बंध असं दिलं. अर्थात मातृ संस्थेची आदर्श महती सांगणारी कविता संग्रह इथे प्रकाशित झाल्याने उपस्थितांनी कौतुक केले. प्रा.गणेश पिंगळे, अश्विनी निवर्गी यांनी मनोगत व्यक्त केले. तर सुनिता देशमुख यांनी आईचे महत्व जीवनात किती आहे हे पटवून दिले. ज्ञानेश्वरी ग्रंथाचा हिंदीतून अनुवाद करणारे वेदालंकार ज्यांचं वय ९४ वर्षे आहे त्यांच्याही साहित्याचा सन्मान कुटुंबियांच्या वतीने करण्यात आला. अध्यक्षीय समारोप करताना डॉ.खुरसाळे यांनी या सर्व कुटुंबियांचं कौतुक करून आईच्या ऋणानुबंधाप्रती लेखणीच्या माध्यमातुन सामाजिक बांधिलकी जोपासत नविन आदर्श प्रस्थापित केल्याबद्दल उपक्रमाचेही कौतुक केले. या सोहळ्यासाठी मोठ्या प्रमाणावर महिलांची तथा विविध क्षेत्रातील मान्यवरांचीही उपस्थिती होती. वर्तमान समाजव्यवस्थेत जन्मदात्याकडून आई - वडिलांची परवड होते. एव्हाना जबाबदारी आणि कर्तव्याची जाणिव जन्म दिलेल्या लेकरांनाही नसते असे अनेक उदाहरणं समोर येत असताना लेकी जेव्हा आईचा स्वलिखित ग्रंथ संपदेने सन्मान करतात यापेक्षा आनंद दुसरा कोणताच नाही हे तितकंच खरं. या अनोख्या सोहळ्याचं शहरात सर्वत्र कौतुक होत आहे.

# गोकुळ शिशुवाटिकेत पंडित दीनदयालजी उपाध्याय यांची पुण्यतिथी साजरी




**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ फेब्रुवारी**

दीनदयाल शोध संस्थान संचलित गोकुळ शिशु वाटिकेत पंडित दीनदयालजी उपाध्याय यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.सर्वप्रथम दीनदयालजींच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन करण्यात आले. सौ.क्रांतीताई पोरवाल यांनी भजन घेतले. पंडित दीनदयालजी उपाध्याय यांच्याबद्दल सौ.स्वातीताई देशपांडे यांनी माहिती मुलांना दिली, त्यानंतर सर्व गटातील विद्यार्थ्यांनी हर्ष पाढेण, पूजा घुंबरे, आरव चव्हाण, शिवांश पवार, वैभवी धापसे, धनश्री कोल्हे, विराज ढगे यांनी पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या जीवनावर भाषणे केली. त्यानंतर सर्व गटातील मुलांनी पंडित दीनदयालयाजी उपाध्याय यांना नमस्कार व पुष्प अर्पण केले. अशाप्रकारे कार्यक्रम घेण्यात आला.

# लिंबागणेशच्या कुंभारवस्तीवर बारवातील रेणुका देवीची शोभायात्रा काढून विधिवत प्राणप्रतिष्ठा,साडेसहाशे भाविकांनी घेतला महाप्रसाद




**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ फेब्रुवारी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश जवळील कुंभारवस्ती येथे सोमवार १० फेब्रुवारी रोजी दुपारी एक वाजता स्थिर मुहूर्तावर बारवातील रेणुका देवीच्या तांदळ्याची विधिवत प्रतिष्ठापणा करण्यात आली.त्यांनतर साडेसहाशे भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

लिंबागणेश जवळील कुंभार वस्तीवर कुलकर्णी - लिंबेकर परिवाराच्या वतीने बारवातील रेणुका देवी मंदिराचे बांधकाम पूर्ण करण्यात आल्यांनतर शुक्रवार ७ फेब्रुवारी रोजी सकाळी ९.३० ते दुपारी १२ वाजेपर्यंत देवीचा तांदळा आहिल्यानगर ते अहमदपूर मार्गावरील कुंभारवस्ती रस्त्यावर ट्रॅक्टरमध्ये ठेवुन मंदिरापर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणूकीत कुंभार वस्ती, रंधवे वस्तीसह मुळूक येथील ग्रामस्थ महिला मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. वस्तीवरील महिलांनी आपल्या घरासमोर रांगोळ्या काढून देवीच्या तांदळ्याचे स्वागत करत दर्शन घेतले.

रविवारी दशविधीस्नान शय्या निवास कार्यक्रम उत्साहात

कुंभार वस्तीवरील बारवातील रेणुका देवीच्या मंदिरात रविवार ९ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ यावेळेत तांदळा प्रतिष्ठापणे पूर्वी गणेश पुजन, पुण्याहन वाचन, दशविधी स्नान, शय्या निवास करण्यात आल्यांनतर महाआरती करण्यात आली.तर सोमवार १० फेब्रुवारी रोजी सकाळी ८ ते १२ यावेळेत प्रात:देवता पुजन, अग्नीमंथन, अग्नीस्थापणा, देवता स्थापणा होमहवन कार्यक्रम पार पडले. या कार्यक्रमाचे पौराहित्य रवी कुलकर्णी व अभय कुलकर्णी यांनी केले.

दुपारी एक वाजता स्थिर मुहूर्तावर तांदळ्याची प्रतिष्ठापणा

कुंभारवस्तीवरील रेणुका देवीच्या मंदिरासमोर सोमवारी दुपारी १२ वाजता पूर्णाहुती व महाआरतीनंतर देवीच्या तांदळ्याची विधिवत प्रतिष्ठापणा करण्यात आली. त्यानंतर दुपारी तीन वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. तांदळा प्रतिष्ठापणा सोहळ्यास अशोक कुलकर्णी, सुरेश कुलकर्णी, रमेश कुलकर्णी, भरत कुलकर्णी, गणेश लिंबेकर, चंद्रकांत कुलकर्णी, विनायक कुलकर्णी, संतोष लिंबेकर, दिनेश लिंबेकर, सुधीर लिंबेकर, विजय कुलकर्णी, केशव कुलकर्णी, सतीश कुलकर्णी, सुर्यकांत कुलकर्णी , अनिल कुलकर्णी, सखाराम कुलकर्णी, दिपक कुलकर्णी, शुभंम लिंबेकर, दिनेश कुलकर्णी, भाग्येश लिंबेकर, यांच्यासह गणपत कुंभार, नारायण ढगारे, भारत जगताप, दादासाहेब ढास, भिमराव रंधवे, श्रीमंत आहेरकर, दिलीप ढास, शहादेव आहेरकर ,बालाजी आहेरकर, बालराजे आहेरकर, आदी उपस्थीत होते.

# संजय गांधी, श्रावणबाळ योजनेतील निराधारांचे अनुदान तात्काळ वितरीत करा

### आ.संदीप क्षीरसागरांचे तहसिलदारांना निर्देश

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ फेब्रुवारी**



संजय गांधी, श्रावणबाळ, इंदिरा गांधी या व अशा प्रकारच्या सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे अनुदान तात्काळ वितरीत करण्याचे निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड व शिरूर कासार तहसिलदार यांना दिले आहेत.

बीड विधानसभा मतदारसंघातील बीड शहर, बीड ग्रामीण व शिरूर कासार तालुक्यातील लाभार्थ्यांना गेल्या अनेक दिवसांपासून संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती वेतन योजना या सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे अनुदान मिळालेले नाही. या योजनेचे लाभार्थी म्हणजे गरजू, निराधार आणि दुर्बल असतात. त्यांचे जीवनमान या अनुदानावर अवलंबून असते. त्यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून या योजनांचे लाभार्थ्यांना अनुदान मिळाले नसल्याने मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे सदरील योजनेच्या लाभार्थ्यांना त्यांना मिळणाऱ्या अनुदानाची रक्कम तात्काळ वितरीत करा असे निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड व शिरूर कासारचे तहसिलदार यांना दिले आहेत.

# विद्यार्थ्यांनी नेहमी अव्वलस्थानी राहण्याच्या ध्येयाने काम केले पाहिजे-अरविंद जगताप

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१३ फेब्रुवारी**

येथील योगेश्वरी महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन दिनांक ८ ते १० फेब्रुवारी दरम्यान यशस्वीपणे संपन्न झाले. या स्नेहसंमेलनाच्या पारितोषिक वितरण व समारोप समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून संवेदनशील लेखक,चला हवा येऊ या खळखळून हसवणाऱ्या कार्यक्रमातील ज्यांच्या संवेदनशील पत्रलेखनाने सर्वांच्या डोळ्यात पाणी आणले असे मराठी चित्रपट पटकथा व संवाद लेखक मा. अरविंद जगताप यांना आमंत्रित करण्यात आले होते. अरविंद जगताप यांनी आपल्या भाषणाद्वारे विद्यार्थ्यांना प्रेरित केले. त्यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांनी नेहमी अव्वलस्थानी राहण्याच्या ध्येयाने काम केले पाहिजे असे प्रतिपादन केले. प्रत्येकाने नेतृत्व करण्याची क्षमता स्वतः मध्ये विकसित केली पाहिजे. विद्यार्थ्यांनी खरकटे होण्यात आपले आयुष्य घालवू नये आणि कोणाचीतरी चमचेगिरी करण्यात धन्यता मानु नहा असा संदेश दिला. त्यांनी चला हवा येवू द्या मधील बापयावरील पत्र वाचून उपस्थितांना भावूक केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सचिव मा. कमलाकरराव चौसाळकर यांनी भुषवले. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी योगेश्वरी महाविद्यालयाचे अनेक विद्यार्थी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उच्च पदावर कार्यरत असल्याचे सांगून महाविद्यालयाच्या यशाची ही परंपरा आपण पुढे चालू ठेवावी व ती वाढवावी असे आवाहन करून सर्व विद्यार्थ्यांनी आणि प्राध्यापकांनी यासाठी अधिकाधिक प्रयत्न करावेत अशा भावना व्यक्त केल्या. याप्रसंगी




योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.चंद्रशेखर बर्दापूरकर, उपाध्यक्ष गणपत व्यास गुरुजी, कार्यकारी उपाध्यक्ष ड. जगदीश चौसाळकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्हि. कानेटकर, उपप्राचार्य डॉ. आर.व्ही. कुलकर्णी, स्नेहसंमेलन प्रमुख डॉ. अनिल नरसिंगे, आय. क्यू.ए. सी. समन्वयक डॉ.सचिन कळलावे, डॉ. महेंद्र आचार्य, विद्यार्थी प्रतिनिधी कु.ईश्वरी खाडे यांची उपस्थिती होती. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्हि. कानेटकर यांनी आपल्या प्रास्ताविकात महाविद्यालयाने गेल्या वर्षभरात राबविलेल्या विविध उपक्रमांचा अहवाल सादर केला.सूत्रसंचालन कु. श्रेया कोंडपल्ले व अक्षता मुळे या विद्यार्थिनींनी केले. आभार प्रदर्शन स्नेहसंमेलन प्रमुख डॉ. अनिल नरसिंगे यांनी केले. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर आयोजित युवा महोत्सवात शास्त्रीय नृत्य या कलाप्रकारात प्रथम आल्याबद्दल महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. ईश्वरी खाडे या विद्यार्थिनीचा तसेच युवा महोत्सवात शॉर्ट टेलिफिल्म मध्ये तृतीय क्रमांक मिळाल्याबद्दल यश केंद्रे, निखिल यादव, ईश्वरी खाडे, दीपक उखंडे, निखिल जाधव या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी गुणवंत विद्यार्थ्यांना व स्नेहसंमेलनानिमित्त आयोजित विविध स्पर्धांमधील विजेत्या स्पर्धकांना पारितोषिके देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

या वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त महाविद्यालयात विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी क्रिकेट, बॅडमिंटन, टेबल टेनिस, बुद्धिबळ, १०० मीटर धावणे, गोळाफेक या क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या क्रीडा स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. तसेच वक्तृत्व, निबंध, रांगोळी, चित्रकला, पोस्टर्स स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. विविध ''डेज'', ट्रॅडिशनल डे, विविध सांस्कृतिक कार्यक्रम व स्पर्धा, फिश पॉन्ड याचेही आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या डेज निमित्त विविध वेशभूषा परिधान करून उपस्थितांचे मनोरंजन केले. तसेच यानिमित्त आनंद नगरीचेही आयोजन करण्यात आले होते. यामध्येही विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या खाद्य पदार्थांचे स्टॉल लावले. सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी कविता, शेरो शायरी, एकपात्री नाटक, भारुड, गायन व नृत्य यांचे उत्कृष्टपणे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.या स्नेहसंमेलनात एकूण ५०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी जल्लोषात सहभाग नोंदविला. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ.सचिन कळलावे, डॉ. राजेश जोशी, डॉ. महेंद्र आचार्य,डॉ. जी. डी. सूर्यवंशी, प्रा. जीवन कोंडरे, डॉ. संतोषकुमार सुर्वे, डॉ. प्रदीप लासोनकर, डॉ. संदीप काळे, डॉ. एस.डी. घन, डॉ. एस. सी. जाधवर, डॉ. सारिका संगेकर, डॉ. सारिका जगताप, सुशील कुलकर्णी, नंदकुमार बलुतकर, मनू कोरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# भारतरत्न नानाजींचे विचार समाजासाठी दिशादर्शक- कुलगुरू डॉ. विजय फुलारी

### स्वा. सावरकर महाविद्यालयात राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ फेब्रुवारी**

देशातील तळागाळातील माणसाला केंद्रस्थानी ठेवून भारतरत्न नानाजी देशमुख यांनी आपल्या ग्रामविकासाच्या कार्याची उभारणी केली, त्यांचे विचार सर्वांसाठी प्रेरणादायी आणि दिशादर्शक आहेत असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू प्रोफेसर डॉ. विजय फुलारी यांनी केले. भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या स्वा.सावरकर महाविद्यालयात दिनांक १३ फेब्रुवारी २०२५ रोजी 'भारतरत्न नानाजी देशमुख अँन आर्किटेक ऑफ रुरल डेव्हलपमेंट इन इंडिया' या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांच्या हस्ते झाले या प्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, दीनदयाळ शोध संस्थान सचिव अभय महाजन, दीनदयाळ शोध संस्थान संचालक डॉ. उपेंद्र कुलकर्णी, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष प्रा. चंद्रकांत मुळे, केंद्रीय कार्यकारणी सदस्य प्रवीण सरदेशमुख, निखिल मुंडले, प्राचार्य डॉ. सुहास मोराळे, परिषदेचे निमंत्रक उपप्राचार्य डॉ. उत्तम साळवे, यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना कुलगुरू डॉ. विजय फुलारी म्हणाले की भारतरत्न नानाजी देशमुख यांनी समाजाच्या कल्याणासाठी आयुष्य खर्ची घातले. अशा राष्ट्रीय परिषदांमधून त्यांच्या विचारांचे मंथन होत आहे ही आनंदाची बाब आहे. भारतरत्न नानाजी देशमुख यांचे विचार प्रेरणादायी असून ते समाजाला विकासाच्या वाटेवर घेऊन जाणारे आहेत. प्रमुख अतिथी डॉ. उपेंद्र कुलकर्णी म्हणाले की, बीड जिल्ह्यात नानाजींचे मोठे काम आहे, त्यांच्या ग्राम विकासाच्या कार्यावर संशोधन होणे आवश्यक आहे. नानाजींच्या विचारांची मांडणी समाजासमोर होणे आवश्यक आहे. अध्यक्ष समारोपात संस्थेचे



अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर म्हणाले की,समाजाच्या सर्वांगीण विकासाची संकल्पना नानाजींनी मांडली. या परिषदेच्या माध्यमातून त्यांचे विचार निश्चितपणे समाजासमोर जातील. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्राचार्य सुहास मोराळे म्हणाले की,नानाजींचे ग्रामविकासाचे प्रेरणादायी विचार समाजासमोर जावेत यातून नवनिर्मिती व्हावी हा या परिषदेच्या आयोजनाचा हेतू आहे. यावेळी डॉ. मेधा गोसावी लिखित 'अवचिता परिमळु' या कविता संग्रहाचे आणि परिषदेच्या स्मरणिकेचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी पूर्णवादी बँकेचे अध्यक्ष डॉ. सुभाष जोशी, केंद्रीय कार्यकारणी सदस्य उमेश जगताप, संजय गुरव, रवींद्र देशमुख, प्रमोद कुलकर्णी, दीनदयाळ शोध संस्थांचे संचालक गंगाधर देशमुख, उमेश मोगरेकर, लक्ष्मीकांत जोशी, प्राचार्या डॉ.प्रीती पोहेकर, प्राचार्य डॉ मुकूंद देवर्षी, उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रूपाली कुलकर्णी यांनी केले. आभार डॉ. उत्तम साळवे यांनी मानले. कार्यक्रमाला विविध महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी यांची उपस्थिती होती. उद्घाटना नंतर परिषदेच्या बीज भाषणात अभय महाजन यांनी नानाजींच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला.

## आनंदाचे डोही


अपर्णा कुळकर्णी / ९४२१२१२४४८

# धर्म संस्कृती पालनाचा आनंद

धर्म जेव्हा शाश्वत सत्याची धारणा प्रबळ करीत मानवतेचे पुष्प फुलवून आनंदाची व्याप्ती वाढवणारा असतो. तेव्हा त्या धर्माची आभा हजारो वर्षांपासून पृथ्वीतलावर मानवाला गुण्यागोविंदाने राहायला शिकवत, वाढतच असते. कितीही आक्रमणे झालीत, टोकाचे संघर्ष झालेत तरी जगाच्या पाठीवर हिंदू धर्माची ध्वज पताका दिमाखाने फडकत राहणार. जनमानसाच्या डगमगत्या श्रद्धेच्या नौकेला विश्वासाचे शिड देण्याचे काम यंदाचा महाकुंभ करीत आहे, असे म्हणूनच जाणवत राहते. धर्म संस्कृतीचा अद्भुत संगम म्हणजे महाकुंभ! महाकुंभ आणि सभोवतीच्या त्या वातावरणाशी जेव्हा आपण समरस होतो तेव्हा चोहिकडे आनंदी आनंद, उल्हास, उत्साहाचे श्रद्धापुष्प उमलून गंधाळत आहे, असे वाटत राहते. याचा खोलवर परिणाम भावी पिढीवर निश्चितच होणार. हे मांगल्याचे बीजारोपण पुन्हा वटवृक्षात परिवर्तित होऊन आपल्या शीतल छायेत चैतन्य आनंदाच्या झुल्यावर भावी पिढ्यांना झुलवण्यासाठी असंख्य पारंब्या घट्ट रुजवून दिमाखात उभे राहील.

वरवर व्यक्ती कितीही आधुनिकतेच्या मागे धावत असला तरी आनंद, शांती, समाधानाचाच शोध घेत मानवाची जीवनयात्रा सुरू असते. हे सातत्याने प्रत्ययास येते. याला कारण आपल्या धर्म संस्कृतीची खोलवर रुजलेली पाळेमुळे! हजारो वर्षांपासून या भूमीवर आध्यात्मिक अधिष्ठान मानवी कल्याणाचे कारक बनून ठामपणे अस्तित्वात आहे. आज तर वैज्ञानिक संशोधनही आपल्या धर्मातील अनेक बाबींना सत्याचे प्रमाणपत्र देऊन त्याचे महत्व अधोरेखित करत आहे. आपल्या निसर्गपूजक संस्कृतीत नद्यांना माता, जीवनदायिनी म्हणून पूजले जाते. त्यामागे अर्थात अनेक हेतू आहेत. पण, अगदी स्पष्ट दोन हेतू आहेत जिची आपण पूजा करणार ती शुद्ध, स्वच्छ, अखंड प्रवाहित ठेवण्याची जबाबदारी आपलीच असायला हवी. जेणेकरून प्रत्येक मानवाला आजीवन शुद्ध जल मिळू शकेल. दुसरा विशेष हेतू अध्यात्मिक उन्नती! आता नुकतेच संशोधन समोर आले आहे. कुंभमेळ्यातील अमृत स्नानाच्या वेळी गंगेच्या पाण्यात आध्यात्मिक लहरींची पातळी वाढलेली दिसून आलीये. आपल्या पूर्वजांच्या शास्त्रशुद्ध अभ्यासातून सिद्ध झालेल्या ज्ञानसागरास नाकारण्यात धन्यता मानण्यापेक्षा, त्याचा सुयोग्य स्वीकार केल्यास जीवनात पावलोपावली आनंदाची अनुभूती आल्याशिवाय राहणार नाही.

धर्म म्हणजे तरी काय हो?'धारयति इति धर्मः' जगताना आपल्या उत्तमाकरीता आपण जे जे धारण करतो किंवा ज्या धारणेतून आपला खरा विकास होत संपूर्ण आनंद स्थितीपर्यंत आपण पोहचणार असतो तो धर्म! धर्म म्हणजे एक सर्वसमावेशक जीवन मार्गदर्शिकाच होय. म्हणून तर मातृधर्म, पितृधर्म, आचार्यधर्म, पुत्रधर्म अगदीच काय तर शेजारधर्म इतक्या साध्यासोप्या जीवन धारणांपर्यंत आपण धर्माला अगदी सोप्पं करून टाकतो. पण, खेदाने म्हणावेसे वाटते की, आजच्या काळात धर्म ही आचरणापेक्षा चर्चा आणि वादविवादाची गोष्ट होऊन बसली आहे. पण, खरंतर धर्मसंस्कृती पालनाचा आनंद आपल्या जाणिवा जागृत, समृद्ध करून नवीन पिढीच्या मनात त्याविषयी औत्सुक्य, आदरभाव निर्माण करतो. आपला धर्म, संस्कृती ही आपली खरी ओळख व जीवन पद्धती असते.



त्याविषयीचे अज्ञान आपल्याला आपल्याच धर्म पालनास परावृत्त करते. याउलट, आपल्या धर्माचे शास्त्रोक्त ज्ञान घेऊन ती शुद्ध ज्ञानधारा अखंड प्रवाहित ठेवण्याचे, शिवधनुष्य पेलून आनंदाच्या डोही आनंद तरंगांचा अनुभव खऱ्या अर्थाने घेता यायला हवा आहे.

सध्या तर सगळीकडे एकच गोष्ट कानावर येतेय, आम्ही प्रयागराजला जाऊन आलोत अन् जाणार आहोत. काय मस्त उल्हासित वातावरण आहे ना! अखिल विश्वाला भारून टाकणारी एक वेगळीच सकारात्मक उर्जा यंदाच्या महाकुंभामुळे निर्माण झाली आहे. महाकुंभात जाऊन स्नान करून, तेथील मंदिरात दर्शन घेऊन त्या वातावरणातल्या चैतन्याने उजळून आलेल्यांच्या, आनंदी अत्तराने इतरांनाही या महाआनंदाची लागण न होणे अशक्यच! त्यांच्या अंतरंगातील प्रसन्नतेच्या सूरांची आळवणी आजूबाजूच्या लोकांच्या मनात त्या आनंदी अनुभवांच्या गीतांची मैफल सजवतात.

'बोलो हर हर गंगे'सह लाखो मुखातून गुंजणाऱ्या मंत्र लहरी परीसर, आसमंत आणि मन दणाणून सोडतात तेव्हा वैश्विक उर्जा उच्च पातळी गाठते. आपण त्या क्षणाचा, धर्म संस्कृतीचाच एक भाग आहोत ही अनुभूती अवर्णनीयच! कुंभ मेळ्यात त्रिवेणी संगमावर गंगास्नानाचा अनुभव मनात पावित्र्याचा आनंदी ओलावा झिरपत ठेवण्याचे कार्य करीत राहणारच. पाप-पुण्य हा भाग सोडून दिला तरी गंगेच्या पाण्याचा तो गारेगार स्पर्श तनामनात जी शिरशिरी निर्माण करतो तो एक वेगळाच आनंदानुभव असतो. संध्याकाळची गंगा आरती म्हणजे एक दिव्य अनुभवच! तो असंख्य ज्योतींचा अननुभूत केशरी प्रकाश, शंखनाद, नदीपात्रातील दीप आणि चोहीकडे माणसांचाच सागर! जातपात, गरीब-श्रीमंत सारे भेदाभेद विसरून आनंदयात्रेत सहभागी सारेच एकरूप भासतात. तेव्हा मानवता धर्म सहजतेने रुजून जातो. तेथील उत्साही सळसळ मनाला हर्षोत्सवी झळाळी देत आहे, या अनुभवात प्रत्येक जण रंगून जातो. याशिवाय, कित्येक आश्चर्यकारक आणि अविश्वसनीय गोष्टी बघायला मिळणे हीसुद्धा कुंभमेळ्यातील पर्वणी असते. आपल्या धर्म संस्कृतीतील माहिती नसलेल्या अनेक अद्भुत, विस्मयकारी गोष्टी तिथे प्रत्ययास येतात. काही आखाडे, साधू जे आपल्या आसपास कधीही, कोठेही दिसत नाहीत. पण, इथे त्यांचे अवचित दर्शन घडते. त्यांच्या जीवनशैलीविषयीचे कुतूहल, उत्सुकता काहींच्या अभ्यासाचा विषय होतो. आखाड्यांच्या भव्य मिरवणुका तर विशेष आकर्षणाचा महाकुंभाचा केंद्रबिंदू होऊ बघतोय. विश्वविक्रमी उपस्थितीचे सर्व उच्चांक मोडीत काढणाऱ्या या महाकुंभमेळ्याचा साक्षीदार होण्याचे भाग्य ज्याला लाभले त्या प्रत्येकाला धर्म संस्कृती पालनाच्या आनंदाचा परिसस्पर्श निश्चितच झाला आहे. या आनंदरथावर स्वार झालेले पवित्र गंगा जलाच्या तुषारांनी पावन झालेले मन एकच मागणे मागत राहील...

***सर्वे भवन्तु सुखिनः सर्वे सन्तु निरामया ।***
***सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दुःखभाग् भवेत् ॥***

---

# वीरांगना रामप्यारी गुर्जर

शुभांगी गान/८६५७४२४०७१

**जिसकी बहादुरी, पराक्रम सब लोगो की जुबानी थी।**
**उत्तर प्रदेश की बेटी राम प्यारी गुर्जरी मर्दानी थी ॥**
**ललकार रही, लहरा रही, हवा मे खड्ग और भाला ।**
**रणचंडिका बन उतरी थी, भभक उठी थी ज्वाला ॥**

कवी दीपक नारंग यांनी तिच्या व्यक्तिमत्वाचं वर्णन या शब्दात केलंय. इतिहासात अशी अनेक रत्नं आहेत ज्यांचा इतिहास अज्ञात आहे. पण, त्या त्या काळात त्यांनी दाखवलेलं शौर्य आणि पराक्रम यांनी एक इतिहास रचलाय, हेही तेवढंच खरं! कोण होती ही रामप्यारी गुर्जर?

ना ती कुठली राणी होती, ना कुठली शासक! वयाच्या अवघ्या २२ व्या वर्षी तिच्या नेतृत्वात ४० हजार महिला



योद्धांनी आक्रांता तैमूरलंगशी दिलेला लढा आश्चर्यचकित करणारा होता. उत्तर प्रदेशातील सहारनपूर, या चव्हाण गुर्जर कुटुंबात जन्मलेली ही मुलगी असामान्य आणि निडर होती. आपण कुस्तीगीर बनावं ,आखाडा गाजवावा ही तिची मनापासूनची इच्छा होती. आपला भाऊ आणि वडील यांच्या समवेत कुस्ती बघायला जाणं, ही तिची आवड होती. सकाळ-संध्याकाळ व्यायाम करून आणि उत्तम जीवनशैलीचं आचरण करून तिने स्वतःला इतकं बहादूर आणि सक्षम बनवलं होतं की, कोणत्याही संघर्षाला तोंड देण्यास ती सक्षम होती. पुरुषी कपडे घालणं तिला मनापासून आवडत असे. १३९८ मध्ये भारत तुघलक शासकांच्या आधीन होता पण, कोणत्याही राजाने त्याचं आधिपत्य मान्य केलं नव्हतं. नासिरुद्दीन तुघलक हा उत्तर प्रदेशातील दुर्बल शासक! समरकंद येथे राज्य करणाऱ्या तैमूर लंगला भारतात प्रवेश करायचा होता आणि त्याच्यासाठी ही उत्तम संधी होती. नासिरुद्दीन तुघलकला हरवून त्याने दिल्ली काबीज केली. त्याला भारतात इस्लामचा प्रसार करायचा होता. असंख्य हिंदू त्याने मारले होते. दिल्ली त्याच्या दहशतीने भयभीत होती. दिल्लीनंतर अनेक तीर्थस्थळांकडे त्याने मोर्चा वळवला. भारतातील सनातन धर्म नष्ट करून इस्लामचं वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या ध्येयाने तो पछाडला होता.

त्याच्या या भयंकर अत्याचाराच्या वार्ता हरियाणा आणि आजूबाजूच्या जाट क्षेत्रांपर्यंत पसरल्या. जाटक्षेत्र प्रमुख देवपाल यांनी या अत्याचाराचा बीमोड करण्यासाठी महापंचायत बोलावली. यात गुर्जर, जाट, राजपूत, ब्राह्मण, वाल्मिकी, अहिर असे विभिन्न समुदाय एकत्र आले. तैमूर विरुद्ध लढायचं, हे एकच ध्येय त्यांच्यासमोर होतं. त्यासाठी गुरीला नीतीचा प्रयोग, ही त्यांची रणनीती होती. त्यांनी सव्वा लाखावार सेना तयार केली. त्यापैकी चाळीस हजार महिला सेनेची कमांडर होती रामप्यारी गुर्जर आणि पुरुष योद्ध्यांचं नेतृत्व महाबली जोगराजसिंह गुर्जर आणि हरविर सिंह गुलिया यांनी केलं. गुरीला नीतीनुसार ते रात्री आक्रमण करीत आणि पहाटेपूर्वी तिथून पलायन करीत. रामप्यारी ने स्वतःची स्वतंत्र रणनीती तयार केली. त्यानुसार तिने आपल्या सैन्याच्या तीन तुकड्या बनवल्या. एक तुकडी त्यांच्या सैन्याला शस्त्र आणि अन्नधान्य पुरवठा करीत असे. दुसरी तुकडी शत्रूचं जेवण नष्ट करायची तर तिसरी रात्रीच्या बेसावध क्षणी अचानक तैमुरच्या सैन्यावर हल्ला करून त्यांना परास्त करीत असे. या महिला लढवय्यांना तिने शस्त्र-अस्त्र आणि युद्धनीतीचे संपूर्ण ज्ञान दिलं. शिवाय पाचशे घोडेस्वार तैमूर विरुद्ध गुप्तहेरीसाठी तैनात केले.

तैमूरलंग दिल्लीवर दहशत पसरवून मेरठकडे येण्यासाठी निघाला. लूटपाट, कत्तली आणि देवस्थळं उध्वस्त करीत त्याने मेरठमध्ये प्रवेश केला. पण, तो चकित झाला. संपूर्ण गाव रिकामं करण्यात आलं होतं. अत्याचार करायला किंवा लूटपाट करायला गावात काहीच नव्हतं. तो हरिद्वारकडे वळला. पण, रस्त्यात रामप्यारी गुर्जर आणि तिच्या साथीदारांनी तैमूरच्या सैन्याला प्रचंड मनस्ताप दिला. परिणामी, त्यांच्यातला लढण्याचा उत्साहच संपला होता. रात्री छापे पडत असल्यामुळे झोप पूर्ण होत नव्हती. त्यात रामप्यारीची एक तुकडी त्यांच्या अन्नधान्याची नासाडी करीत असे. ना जेवण ना झोप! सैन्य थकलं होतं. रामप्यारी गुर्जर आणि जोगराज सिंह गुर्जर यांनी केलेल्या जबरदस्त आक्रमणाने तैमूरची असंख्य सेना मारली गेली. हरिद्वारमध्ये तर तैमूरच्या सेनेचा त्यांनी प्रचंड पराभव केला. पलायन करणाऱ्या तैमुरच्या छातीवर हरवीर सिंह गुलियाने केलेला भाल्याचा वार इतका जबरदस्त होता की, जखमी तैमूर त्यातून वाचू शकला नाही. जखम चिघळली आणि त्यातच १४०५ मध्ये त्याचा मृत्यू झाला. तैमूरसारख्या अत्यंत क्रूर शासकाला महिलांच्या एका सेनेने आणि त्यांची सेनापती रामप्यारी गुर्जरने दिलेला लढा खरंच अभूतपूर्व असाच होता.

---

# खुलला रंग मेंदीचा...

भारती सावंत/ ९६५३४४५८३५

***मेंदीच्या पानावर, मन अजून झुलते गं...***
***जाईच्या पाकळ्यांस, दव अजून सलते गं...***

गोऱ्या तळहातांवर मेंदी लावायला न आवडणारी यौवना विरळीच! भारतीय संस्कृतीत परंपरांचा खूप सन्मान होतो. वधू-वरांच्या हातावरील मेंदीही याला अपवाद नाही. स्त्रिया-मुली सणासुदीला आपल्या हातांवर मेंदीची सुंदर डिझाईन काढतात. हातावरील मेंदीची नजाकत तरी वाखाणणीयच! सुंदर कलाकुसर केलेले ते मेंदीने रंगलेले हात आपल्या भावी पतीराजाच्या हातात देताना, नववधू किंचित थरथरते. परंतु, त्यातही नवरोबावरील विश्वास आणि प्रेम सामावलेले असते. सुंदर नाजूक फूलवेलींची कलाकुसर करून वधूच्या हातावर रेखाटली जाते. ४-५ तास चालणारा हा कार्यक्रम कंटाळवाणा असला तरी, दुसऱ्या दिवशी त्या हातांचे सौंदर्य पाहण्याजोगे असते. ते पाहताना सारेच थक्क होतात. पण, मेंदीच्या डिझाईन आणि त्या हातांवर स्तुतिसुमने उधळतात.

***लावा गं सयांनो साऱ्या, मेंदी सखीच्या हाताला***
***सखा साजण पाहिल गं, तिच्या तळहाती स्वतःला***

'फुलले रे क्षण माझे फुलले रे'... तळहातावरील मेंदी पाहत प्रत्येक यौवनेच्या मनात हेच तर तरळते. हाताला लावताना ओलसर हिरवी सुंदर नक्षी गुरफटलेली ही मेंदी दुसऱ्या दिवशी तळहाताचे सौंदर्य कित्येक पटींनी वाढवते अन् तरूणी 'खुलविते मेंदी माझा रंग गोरापान' असे गुणगुणत आपला तळहात वारंवार न्याहाळते.

स्त्रियांना सोनेहिऱ्याच्या अलंकाराप्रमाणे मेंदीही खूप आवडते. म्हणूनच सणावाराला, कार्यक्रमाला त्या आपल्या हातावर सुंदर मेंदी रेखाटतात. विवाहप्रसंगी संपूर्ण हात भरून नक्षी असलेली मेंदी नववधूया सौंदर्यात भरच घालते. म्हणूनच छायाचित्रकार मेंदी काढलेल्या दोन्ही तळव्यांचे छायाचित्रण मुद्दाम करतात. मेंदी तळहातांची नजाकत वाढवतेच पण, तिची लालीही गालावर उमटवते.

मेंदी शरीराला थंडावा देते नि मनाला उभारा! आमच्या लहानपणी असे तयार कोन उपलब्ध नव्हते. प्लास्टिकच्या पाकिटात मिळणारी मेंदी पावडर चहाच्या पाण्यात किंवा कात घालून आणि लिंबू पिळून दिवसभर भिजवली जायची. रात्री जेवून झाल्यावर ती आगपेटीच्या काडीने हलक्यानेच हातावर काढली जायची. डाव्या हाताला मेंदी जरा जास्तच मनापासून लावली जायची. उजवा हात कामाचा म्हणून कधीकधी गोल ठिपके किंवा सारवल्यासारखी ओली मेंदी हातावर पसरली जायची. सकाळी लवकर उठून आपला मेंदीने रंगलेला हात पाहताना कोण आनंद व्हायचा! त्याही आधी मेंदीची पानं तोडून आणून पाट्यावर वाटली जायची. ती नैसर्गिक मेंदी वाटता वाटताच हात लाल होऊन जात. मैत्रिणी, बहिणी एकत्र मेंदीची पाने वाटून हातावर नक्षी काढत. जिची मेंदी जास्त रंगायची ती भाव खाऊन जायची. मग इतर जण तिला 'नवरा खूप प्रेम करणारा मिळणार बरं का' असे म्हणून चिडवत. हाताला मेंदी लागली की, घरातील जाणत्या बायका दोन दिवसात हिचा विवाह होऊन ही आपल्याला सोडून जाणार म्हणून हळव्या होत. वधू मात्र कधी येणार स्वप्नातील राजकुमार आणि मला घेऊन जाणार दूर त्याच्या गावी? अशी तिची स्थिती होई.

***चढली मेंदीची ही लाली, वर वधूच्या हातांवरती***
***गुलाब फुलुनीच गाली, प्रेमीच्या ओढीने झुरती***

लग्नाच्या वेळी वधूपक्षाकडून वधूकडे मेंदी पाठवली जाते. तीच मेंदी वधूच्या हाताला लावली जाते. त्यावेळी नक्षीच्या आत वराचे नावही रेखाटले जाते.आपल्या भावी नवऱ्याला आपले मेंदीने रंगलेले हात दाखवण्यासाठी ती उतावीळ असते. तिचे मन फुलपाखरू होऊन हवेत तरंगते. आपले आरस्पानी सौंदर्य पाहून आपला साजण किती आनंदेल. आपल्यावर कौतुकाचा वर्षाव होईल आणि आपणही त्या विश्वात रमून जाऊ. किती सुंदर असतील ते क्षण!

***मनमयुर हा लागला नाचू, येईल सखा हा राजकुमार***
***जाईल हरखून हे तनमन, घोड्यावरती असे तो स्वार***

---

## अभिजात अमृत

प्रा. सुनंदा पाटील/ ८४२२०८९६६६

# डोईचा पदर आला खांद्यावरी...

संत साहित्य हा भक्तिमार्गीयांचा शब्द आविष्कार आहे. भारताच्या सांस्कृतिक इतिहासाचा फार मोठा कालखंड भक्तिमार्गाने दुमदुमला. या काळात विविध धर्मपंथ, संप्रदाय होते. एवढेच नाही तर उपास्यदेवताही विविध होत्या आणि उपासना मार्गही! परंतु, त्यांचे प्राणतत्व एकच आणि ते म्हणजे भक्तिभाव!

या परंपरेत दक्षिणोत्तर किंवा पूर्वपश्चिम भारताचा विचार केला तरी, महाराष्ट?ात स्थापित असलेला वारकरी संप्रदाय हा खूप महत्त्वाचा ठरतो. इथल्या संतांची भूमिकाही महत्त्वाची आहे. सर्व भक्तिसंप्रदायांच्या या पसाऱ्यात महाराष्ट?ाचं स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. भौगोलिकदृष्ट्या महाराष्ट? हा भारताच्या मध्यावर आहे. भाषिकदृष्ट्या आर्यभाषिक प्रदेशांच्या सीमा आणि द्रविड भाषिक प्रदेशांच्या सीमा असलेले शेजारी चारही बाजूंनी आहेत. त्यामुळे उत्तर-दक्षिण, आर्य-द्रविड सर्वांना सामावून घेण्याचं सांस्कृतिक कार्य महाराष्ट? प्राचीन काळापासून करीत आला आहे. व्यापक अर्थाने महाराष्ट? हे भारतीय संस्कृतीचे संगमतीर्थ आहे.

स्थूलमानाने इसवीसनाचे बारावे ते सतरावे शतक हा ५ ते ६ शतकांचा काळ भक्तिमार्गाचा कालखंड मानता येईल. स्वातंत्र्योत्तर काळात काही साहित्यप्रकारांनी जो 'आवाज' दिला, तेच काम भक्तीचळवळींनी मध्ययुगातच केले. समाजातील प्रस्थापितांनी धर्मक्षेत्रात जे मापदंड निर्माण केले होते ते भक्तीमार्ग यांनी झुगारून दिले. कृत्रिमता, पाखंड उघडे पाडले. न्यूनगंडातून उपेक्षितांची मुक्ती केली, त्यांचा आत्मविश्वास जागवत आत्मप्रतिष्ठेचा मार्ग प्रशस्त केला.

वरील हेतू सिद्धीस नेण्यासाठी संत साहित्य निर्माण करावे लागले नाही तर, ते निर्माण झाले. अखिल भारतात काश्मिर ते कन्याकुमारी आणि बंगाल ते आसाम इथपर्यंत अनेक संत झाले. त्यातही स्त्रीसंतांनीसुद्धा साहित्यात खूपच मोलाची भर घातली. विस्तारभयास्तव इथे सगळी नावे घेता येणार नाहीत. महाराष्ट?ातील वारकरी संप्रदाय तर जात, धर्म, स्त्री, पुरुष हा भेद न करता,'आम्ही आनंदे नाचू गाऊ' म्हणणाऱ्या संतांमधे अनेक स्त्री संत झाल्या.

मुक्ताई! ज्या कुळकर्णी भावंडांना संन्याशाची मुले म्हणून यज्ञोपवित संस्कार करण्यास नकार दिला. निवृत्तीनाथ त्यावेळी दहा वर्षांचे तर मुक्ताई फक्त चार वर्षांची! दादाच तिचे पालक आणि गुरू झाले. त्यात मुक्ताई, तिचा विवाह हे तर दूरदूरपर्यंत शक्य नव्हतं. पण, त्यामुळे मुक्ताईचे साहित्य, तिचे अभंग कम अस्सल ठरत नाहीत. त्यांची काव्यरचना ही अतिशय मौलिक आहे. त्यातही 'ज्ञानदेव तुकाराम' या मध्यमपदलोपी समासात जी वारकरी संत मंडळी आहे, त्या स्त्री संतांमधे संत मुक्ताई, संत जनाबाईंचे नाव महत्वाचे आहे. निर्मळा, नागी, कान्होपात्रा, बहिणाबाई, सोयराबाई, लिंबाई, विठाबाई अशा आणखी अनेक स्त्रीसंत आहेत.

मुक्ताबाईंना अतिशय अल्पायुष्य मिळालं. अतिशय विचित्र आयुष्य या चारही भावंडांच्या वाट्याला आलं. त्यात मुक्ताई सर्वात धाकटी असूनही सर्वांची आई झाली. समाजात मिळणारी वागणूक बघून, ज्ञानेश्वर महाराज अतिशय दुःखी झाले आणि झोपडीची ताटी (दरवाजा) बंद करून घेतला. सर्व भावंडांनी त्यांना बाहेर येण्याची विनंती केली. तर, मुक्ताईने आपल्या अभंगांमधून त्यांचे मन वळवले. तेच अभंग पुढे ताटीचे अभंग म्हणून प्रसिद्ध झाले.

***चिंता क्रोध मागे सारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥***
***विश्व रागे झाले वन्ही । संती सुखे व्हावे पाणी ॥***
***शब्दशस्त्रे व्हावे क्लेष । संती मानावा उपदेश ॥***
***विश्वपट ब्रह्म दोरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥***
***संत तोची जाणा जगी । दया क्षमा ज्याचे अंगी ॥***
***लोभ अहंता न ये मना । जगी विरक्त तोची जाणा ॥***
***मिथ्या कल्पना मागे सारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥***

चिमुकल्या बहिणीने केलेली ही विनवणी माऊलींना टाळता आली नाही आणि ते बाहेर आले. संत कसा असावा? याचं अतिशय सुंदर विवेचन यात आहे. या शिवायही मुक्ताईच्या अनेक अभंग रचना प्रसिद्ध आहेत. तशीच कान्होपात्रा! ती कोण होती?काय? यावर विवेचन नको. ती फक्त विठ्ठलभक्त होती, स्त्रीसंत होती.

***नको देवराया अंत अता पाहू***
***प्राण हा सर्वथा जाऊ पाहे ॥***
***हरिणीचे पाडस व्याघ्रे धरियेले***
***मजलागी जाहले तैसे देवा ॥***
***मोकलोनी आस जाहले उदास***
***घेई कान्होपात्रेस हृदयात ॥***

हा तिचा अभंग सर्वश्रुत आहे. संत बहिणाबाई! सांसारिक सुख तिला फारसं लाभलं नाही. जरठ नवयाशी संसार करावा लागला. त्यांचाही अभंग बघा.

***विरक्तीचे मूळ । प्रपंचाचा त्याग ॥***
***पाहताचि एक । गृह शैल ॥***

स्त्री ही मोक्षमार्गातली धोंड, ही आजवरची धारणा ! पण, घर हा परमार्थ मार्गातला स्त्रीच्या दृष्टीने फार मोठा टप्पा असल्याचे ती बोलून दाखवते. अशा अनेक स्त्रीसंत आहेत. त्यांचं साहित्यही विपुल आहे. मात्र, त्यात संत जनाबाई यांचं स्थान वेगळं आणि मोठं आहे.

संत जनाबाईंच्या अभंगात विठ्ठलाचं वर्णन आहेच. पण, त्यासोबतच स्त्रीचं वागणं, जगणं, तिची अगतिकता याचं खूप छान वर्णन आहे. त्यात स्त्रीच्या मुक्तीसाठी असलेल्या रचना तर आपल्याला अंतर्मुख करून जातात.'डोईचा पदर आला खांद्यावरी' हा अभंग हे त्यावरचं उत्तम उदाहरण आहे. आपल्या विपुल रचनेत 'नामयाची दासी जनी' ही नाममुद्रा धारण करणारी जनाबाई सर्व वारकरी स्त्री संतांमध्ये अतिशय लोकप्रिय आहे. ती महाराष्ट?ाच्या लोकजीवनाचा विशेषतः स्त्रीजीवनाचा एक भाग कायमचा बळकावून बसली आहे. विठ्ठलाने सगुणरूपाने तिच्याबरोबर दळणकांडण, धुणीभांडी, झाडलोट, शेणगोठा ही ग्रामीण कष्टकरी स्त्रीची नित्य कामे करीत राहणे, तिच्या फाटक्या गोधडीत झोपणे, तिच्यासोबत ताककण्या खाणे, तिची वेणीफणी करणे या प्रकारच्या वर्णनाच्या शेकडो ओव्या आजही ग्रामीण स्त्रीच्या मुखी गुंजत आहेत. महत्वाचे म्हणजे ही वर्णने जनाबाईंच्या अभंगांतूनही आली आहेत.

***तुळशीचे वनी, जनी उकलिते वेणी***
***हाती घेऊनिया लोणी, सेवा करी चक्रपाणी***

***इठ्ठलाच्या गं देवळात, मी होईन पारवा***
***देवाच्या नावाचा मी गं वेचीन सरवा***

अशा ओव्यांबरोबर जनाबाईच्या निमित्ताने, उपेक्षित श्रमकरी स्त्री आपल्या मानसविश्वात विठ्ठलाबरोबरच एक वेगळा प्रपंच थाटून, त्यात रंगून बसली असावी असे वाटते. अनेक स्त्रियांच्या मनात घर करून राहणारी जनाई, वास्तवात मात्र बेघर होती. तिचं वास्तव जीवन अत्यंत खडतर आणि उपेक्षित होतं.


दामाशेटकडे आल्यानंतर लगेचच तिचे आईबाप गेले. ही घटनाही जनाईच्या अभंगातून येते.

***माय मेली बाप मेला, आता सांभाळी विठ्ठला***
***मी तुझे गा लेकरू, नको मजसी अव्हेरू***

जनाईला संत नामदेव महाराजांबद्दल असलेला आदर आणि भक्तिभाव तिने परोपरीने वर्णन केलाच आहे. तेवढीच ज्ञानदेवांविषयी असलेली ओढ तिने व्यक्त केली आहे. ते तिच्या अभंगांमधून जाणवते. दासी शब्दाविषयी बोलायचे तर जनी किंवा नागी (नामदेवांची पुतणी) तिचाही उल्लेख दासी असाच आहे. दासीचा अर्थ शिष्या असा घ्यायला हरकत नाही कारण, खुद्द ज्ञानेश्वरांनी,'म्हणे निवृत्तीदासु' म्हणत आपले शिष्यत्व विनम्रभावे अधोरेखित केलेले आहे.

विठ्ठलाच्या लेकुरवाळेपणाचे खूप सुरेख वर्णन जनाबाई करतात.

***विठु माझा लेकुरवाळा, संगे गोपाळांचा मेळा ॥***
***निवृत्ती हा खांद्यावरी, चोखा जीवा बरोबरी ॥***
***बंका कडियेवरी, नामा करांगुली ही घरी ॥***



***जनी म्हणे गोपाळा, करी भक्तांचा सोहळा ॥***

जनाई संत नामदेवांच्या घरी त्यांची शिष्या म्हणून राहत असे.

'दळीता कांडिता...तुज गाईन अनंता' म्हणणारी जनाई आपल्याला कळते. जनाईला तिच्या प्रत्येक कार्यात विठ्ठलाने मदत केली. तोही अभंग फारच सुरेख आहे.

*माळ पदक विठ्ठल, विसरला भक्ताघरी*
*झाली पदकाची चोरी, आला आळ जनीवरी'*

संतसहवासाने तिला जो थोडाफार आधार मिळाला त्यात ती धन्यता मानते.

स्त्रीजन्म म्हणवूनी न व्हावे उदास, साधुसंती ऐसे मज केले

'विदुर सात्विक माझिये कुळीचा' असा ती उल्लेख करतेच. तसेच चोखामेळा, रोहिदास यांच्याविषयी तिला अभिमान वाटतो. संत आणि देव ती एकरूप मानते. जनाईचे देवाशी एवढे एकरूपत्व आहे की,

***'देव खाते, देव पिते,***
***देवावरी मी निजते,***

देवाविण नाही रिते।। याचा साक्षात अनुभव ती घेते. जनाबाईला संतांनी आधार दिला असला तरी, जनसामान्यांनी तिच्या चारित्र्यावर आक्षेप घेतले असणारच. म्हणून अखेर निर्धाराने तिला सांगावेसे वाटते,

***डोईचा पदर आला खांद्यावरी,***
***भरल्या बाजारी जाईन मी***
***हाती घेईन टाळ खांद्यावर विना,***
***आता मज मना कोण करी***
***पंढरीच्या वाटे मांडियले पाल,***
***मनगटावर तेल घाला तुम्ही***
***जनी म्हणे देवा मी झाले वेसवा,***
***रिघाले केशवा घर तुझे***

किंवा

***जनी बैसली न्हायाला, पाणी नाही विसणाला***
***हाती घेऊनी घागरी, देव निघाले तातडी***

ही लोकपरंपरेतील जात्यावरची एक ओवी! इथे आशय आणि रचनेत सारखेपणा आढळतो. गोदाकाठच्या गंगाखेड येथील दमा आणि करूंड या शूद्र भगवतभक्त दांपत्यांची जनी ही नवसाची लेक! पांडुरंगाच्या दृष्टांतानुसार ती पाच वर्षांची होताच तिला दामा शिंप्याच्या स्वाधीन केले. पुढे त्यांचा लेक नामा म्हणजेच संत नामदेव महाराज जे मोठे विठ्ठल भक्त झाले. त्याची दासी म्हणवून घेत जनाई जगली. जनाईचा जन्ममृत्यू काळ याबद्दल नेमके संदर्भ उपलब्ध नाहीत. पण, नामदेवांच्या बारशाला प्रत्यक्ष पांडुरंग रुक्मिणी, बाळंतविडा घेऊन आल्याचे ती वर्णन करते. म्हणजे, नामदेव महाराजांपेक्षा ती खचितच ५-७ वर्षांनी तरी मोठी असावी. पुढे इ.स.१३५० मध्ये संत नामदेव महाराजांसोबतच ती पायरीच्या चिऱ्यात अंतर्धान पावली, अशी लोकश्रद्धा आहे.'पंढरी पंढरी, विठुरायाची नगरी' म्हणून साद घालणाऱ्या ग्रामीण स्त्रीला पंढरपूर, विठ्ठल, रखुमाई, संतजन हा सर्व गोतावळा आपल्या जीवीचा माहेरचा जिव्हाळा वाटतो.

***रुक्मिणी कालविते, निरशा दुधामधी केळं***
***देवाला आवडतं, जनाचं ताक शिळं***

अशा ओवीतून विठ्ठल आणि जनाबाई यांच्या नात्याचे सूचन होते.

***आषाढीला मी नाही गेले, कर्तिकीला गं जाईन***
***देव पंढरीचा गं विठू, विटे उभा मी पाहीन***
***गोपाळपूरा जाया, जनाईला गं झालं ऊन***
***देवा या विठ्ठलानं, यानं लाविलं गं चिंचबन***

किंवा

असं म्हणणारी जनाबाई ही मीराबाईचीच सखी वाटते. जननिंदेच्या भयापासून स्वतःला मुक्त करणारी जनाई! देहाची सुरक्षितता आणि त्यासाठी पाळावी लागणारी जनमर्यादा तिने कस्पटासमान मानली. ती जीवन्मुक्तच होती.

स्त्री ही विवाहित असली काय, अविवाहित किंवा विधवा असली काय? देहसंबद्ध असे तिचे चारित्र्य, लोकनिर्बंध, लोकसमज आणि लोकेच्छा हा एकूणच स्त्री जीवनातील एक मोठा अडसर होता, आहे आणि राहणार आहे. याच्या आधारे समाज स्त्रीला जीवनातून उठवू शकतो. हे लोकापवादाचे दडपण स्त्रीमनावर सतत टांगते असते. ते एक शस्त्र असते. सीता, द्रौपदीसह अनेक स्त्रिया याच मापदंडाने दंडिल्या गेल्यात. स्त्री संतांचेही तेच झाले. मुख्य म्हणजे त्यांचे संतत्व सिद्ध होईपर्यंतच्या वाटचालीचे काय? नंतर, याच समाजाने त्यांचा उदोउदो केला. म्हणूनच जनाई म्हणते, 'स्त्री जन्म म्हणवूनी न व्हावे उदास!'

अतिशय परखड पण मौलिक काव्यरचना करणारी संत जनाबाई म्हणूनच मला आवडते. भारतीय संत साहित्यात स्त्री मुक्तीच्या साहित्याची भर घालणारी ही संत स्त्री, तिचे काव्य, अभंग आणि विचारधन आजच्या काळालाही लागू आहेत.

# हिंगोलीत आयुष्मान कार्ड नोंदणीसाठी पाच ठिकाणी शिबीर

## नगर पालिकेच्या उपक्रम, नोंदणीसाठी नागरिकांची मोठी गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ फेब्रुवारी**

नगर पालिका प्रशासनाच्यावतीने हिंगोली शहरात पाच ठिकाणी आयुष्मान कार्ड नोंदणीसाठी शिबीरे लावण्यात आली असून नोंदणीसाठी नागरिकांनी लांबच लांब रांगा लावल्याचे दिसत होते. सर्वसामान्य आणि गोरगरीब नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी या शिबीरांचे आयोजन करण्यात आले आहे.



केंद्र शासनाच्यावतीने आयुष्मान भारत योजनेमध्ये पात्र लाभार्थ्यांना पाच लाख रूपयांपर्यंतचे औषधोपचार मोफत दिले जातात. मात्र अनेक ठिकाणी नागरिकांकडे योजनेचे कार्ड नसल्यामुळे नागरिकांची मोठी अडचण होऊ लागली आहे. गंभीर आजारी रूग्ण उपचारासाठी किंवा शस्त्रक्रियेसाठी रूग्णालयात दाखल केल्यानंतर रूग्णांच्या नातेवाईकांची कार्ड काढणे किंवा इतर कागदपत्रे जमा करण्यासाठी चांगलीच दमछाक होऊ लागली. या बाबींचा विचार करता मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली नगर पालिकेने आयुष्मान कार्ड नोंदणीसाठी शहरात पाच ठिकाणी शिबीरे लावली आहेत. त्यानुसार दि १३ फेब्रुवारी रोजी सकाळी अकरा वाजल्यापासून शहरातील लोकनेते गोपीनाथराव मुंढे शेतकरी भवन मंगळवारा या भागात शिबीर लावण्यात आले. या नोंदणीसाठी परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केल्याचे पहायला मिळाले.

या शिबीरासाठी उपमुख्याधिकारी प्रकाश साबळे, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, अभियान व्यवस्थापक पंडीत मस्के, नितीन बनकर, संदीप गायकवाड यांच्यासह कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या शिबीराला मोठा प्रतिसाद मिळत असून दिवसभरात सुमारे एक हजारापेक्षा जास्त नागरिकांनी कार्डसाठी नोंदणी केल्याचे समजते.

दि १४ फेब्रुवारीपासून या योजनेच्या नोंदणीसाठी शहरातील मस्तानशहा नगरातील समाज मंदिर, दि १८ रोजी समाज मंदिर गणेशवाडी, दि २० रोजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे समाज मंदिर सिध्दार्थ नगर, दि २१ रोजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे समाज मंदिर नगर पालिका वसाहत या ठिकाणी सकाळी अकरा वाजल्यापासून शिबीरांचे आयोजन करण्यात येणार आहे.

नागरिकांनी नोंदणीसाठी येतांना त्यांचे आधारकार्ड व त्याला लिंक असलेला मोबाईल आणणे बंधनकारक आहे. या शिबीराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांनी केले आहे.

# छत्रपती शिवरायांच्या ऐतिहासिक माहीती चित्रप्रदर्शनीचे उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ फेब्रुवारी**

छत्रपती शिवाजी महाराज पूर्णाकृती पुतळा परिसरात सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समिती हिंगोलीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन चरित्रावर आधारित ऐतिहासिक माहिती सांगणाऱ्या चित्रप्रदर्शीनीचे उद्घाटन समितीचे अध्यक्ष ॲड. उल्हास पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी शाळकरी विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. शिवजन्मोत्सवानिमित्त सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने गुरुवार दि.१३ फेब्रुवारी रोजी ऐतिहासिक चित्रप्रदर्शनीचे उद्घाटन करण्यात आले. या सोहळयास समितीचे कार्याध्यक्ष बिरजू यादव सचिव सागर डांगे, मार्गदर्शक कल्याण देशमुख, ॲड.अमोल जाधव, पदाधिकारी ॲड दिलीप भाकरे, त्र्यंबकराव लोंढे, ॲड. नागेश अंभोरे, बालाजी वानखेडे, मुख्याध्यापक डॉ.प्रकाश अंभोरे, शिक्षिका सीमा खटाणे, रवींद्र जांभळे आदींसह पदाधिकारी व समिती सदस्य उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन चरित्रावर आधारित ऐतिहासिक चित्रप्रदर्शनीचे रेखाटन मिलिंद विचारे यांनी केले आहे. शिवविचारावर आधारित सर्व परिसरात चित्रप्रदर्शनी उभारण्यात आली आहे. समितीने शिवप्रेमींना शुभेच्छा बॅनर ऐवजी माहिती देण्याचा वेगळा उपक्रम हाती घेतला आहे. गेल्या चार वर्षापासुन चित्रप्रदर्शनी शालेय विद्यार्थी, तरुण व सर्वांना शिवविचार व संस्कार मिळावेत यासाठी कक्ष स्वरुपात प्रदर्शनी शिवजयंतीला उभारण्यात येते. यामध्ये ३५ विविध देखाव्यासह ऐतिहासिक माहिती रेखाटण्यात आली आहे. ही प्रदर्शनी पाहण्यासाठी विद्यार्थी व तरुणांची गर्दी होत आहे. समितीच्या या उपक्रमाचे जनतेतुन कौतुक होत आहे. यावेळी विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा जयजयकार केला.

# व्हॉलीबॉल स्पर्धेचे हिंगोलीत थाटात उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ फेब्रुवारी**

सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समिती हिंगोली द्वारा आयोजित व्हॉलीबॉली स्पर्धेचे बुधवारी मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये मोठया थाटात उद्घाटन करण्यात आले. शिवजन्मोत्सवानिमित्त सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने बुधवार दि. १२ फेब्रुवारी रोजी रात्री ७.३० वाजता जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या परिसरामध्ये व्हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटन शिवसेना जिल्हाप्रमुख अजय उर्फ गोपु पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन समितीचे अध्यक्ष ॲड उल्हास पाटील, कार्याध्यक्ष बिरजु यादव, सचिव सागर डांगे, उपाध्यक्ष जहिरभाई विटवाले, मार्गदर्शक कल्याण देशमुख, शिवाजी ढोकर पाटील, स्पर्धा आयोजक तथा मा.नगरसेवक उमेश गुठ्ठे, गजानन सोळंके, अंभोरे आदींची उपस्थिती होती. व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी एकुण आठ सह संघानी सहभाग नोंदविला होता. व्हॉलीबॉल च्या मॅचेस रात्रीला होत आहेत. स्पर्धा यशस्वीतेसाठी उमेश गुठ्ठे, मनोहर मगर, प्रभाकर काळबांडे, मिर्झा सलीम, कार्तिक यादव, नरवाडे आदी परिश्रम घेत आहेत.

या स्पर्धेत अनेक संघांनी सहभाग नोंदविला असून व्हॉलीबॉल स्पर्धेचे सामने चुरशीचे होत आहेत. सामने पाहण्यासाठी प्रेक्षकांची मोठी गर्दी होत आहे.



**हिंगोली– सार्वजनिक शिवजयंती निमित्त येथील पोलिस मुख्यालयात शांतता समितीचे पदाधिकारी व सदस्य तसेच शिवजन्मोत्सव समितीचे पदाधिकारी व सदस्यांची बैठक घेण्यात आली. यावेळी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी शिवजयंती महोत्सव शांततेत व सामाजिक सलोखा राखत पार पाडण्याचे आवाहन केले. यावेळी उपअधीक्षक सुरेश दळवी, पोनि नरेंद्र पाडळकर, समितीचे अध्यक्ष ॲड उल्हास पाटील, सचिव सागर डांगे, मधुकर मांजरमकर, बालाजी वानखेडे आदींची उपस्थिती होती. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### प्रा प्रकाश पतंगे परभणी आकाशवाणीवर



हिंगोली– श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय येथील साहित्यिक, वक्ते, प्रा.प्रकाश यादवराव पतंगे यांचे देशभक्ती, त्याग, निष्ठा, संस्कार, जिद्द आणि जिज्ञासा, सेवा, शिस्त आणि करुणा याबरोबरच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त रयतेचा राजा छत्रपती शिवाजी महाराज आणि जागतिक मातृभाषा दिनानिमित्त मायबोली मराठी भाषेचे श्रेष्ठत्व अशा विविध विषयावर दिनांक १९ फेब्रुवारी ते २७ फेब्रुवारी पर्यंत सलग दहा भाग आकाशवाणी परभणी केंद्रावरून सकाळी सहा वाजून पाच मिनिटांनी प्रसारण होणार आहे. याबद्दल श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक माजी शिक्षणाधिकारी शिवाजीराव पवार, अध्यक्षा सौ. मंदाताई पवार, प्राचार्य डॉ.बाळासाहेब क्षीरसागर, डॉ किशोर इंगोले, प्रा. देवानंद येवले, उपजिल्हाधिकारी महादेव किरवले, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अविनाश राऊत यांच्यासह अनेकांनी अभिनंदन केले असून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

### सेनगावात अतिक्रमणावर हातोडा



हिंगोली– सेनगाव शहरातील तहसील कार्यालय, कृषी उत्पन्न बाजार समिती तसेच मुख्य रस्ता ते सेनगाव टी पॉईंट पर्यंतच्या अतिक्रमणावर नगर पंचायत तसेच तहसीलच्या पथकांनी हातोडा चालविला आहे. यावेळी मोठा पोलिस बंदोबस्तही लावण्यात आला होता. मागील अनेक वर्षापासून ही अतिक्रमणे असल्यामुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत होता. त्यामुळे दि १३ फेब्रुवारी रोजी जेसीबी मशीनने ही अतिक्रमणे पोलिस बंदोबस्तात हटविण्याची कारवाई करण्यात आली. यामध्ये काही स्थानिक पुढाऱ्यांची अतिक्रमणे देखील असल्याची चर्चा होत आहे. या मोहीमेत नायब तहसीलदार सरोदे, अंभोरे, जमादार चव्हाण यांच्यासह नगर पंचायतचे कर्मचारी यांनी सहभाग घेतला.

### पोलिसांची ८१ वाहनचालकांवर कारवाई

हिंगोली– अवैध वाहतुक करणारे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ८१ वाहन चालकांविरूध्द पोलिस विभागाने कारवाई करीत त्यांच्याकडून १ लाख ४५०० रूपयांचा दंड वसूल केला आहे.

# जात, धर्म विरहीत सुसंस्कृत समाज घडविण्यासाठी धम्म परिषदांचे आयोजन– डॉ उपगुप्त महास्थवीर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ फेब्रुवारी**

सर्व जाती–धर्माचे लोक एकत्र येऊन जात धर्म विरहित व सुसंस्कृत समाज घडविण्यासाठी धम्म परिषदांचे आयोजन केले जात असल्याचे प्रतिपादन अखिल भारतीय भिक्खू संघाचे कार्याध्यक्ष डॉ. उपगुप्त महास्थवीर यांनी केले.



हिंगोली येथील जेतवन बौद्ध प्रशिक्षण केंद्र अंधारवाडी च्या वतीने दि. ११ फेब्रुवारी मंगळवार रोजी २३ व्या बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन केले होते. याप्रसंगी अध्यक्षस्थानी भंते धम्मसेवक महास्थवीर हे होते तर उद्घाटक डॉ.उपगुप्त महास्थवीर हे होते. यावेळी प्रमुख धम्मदेशना भिक्खू प्रा. डॉ. खेमधम्मो महाथेरो संयोजक भिक्खू पय्यारतन थेरो , भिक्खू प्रा.डॉ. सत्यपाल महाथेरो, भिक्खू डॉ. इंदिवंस महाथेरो, भिक्खू करुणानंद थेरो, भिक्खू ज्ञानरक्षित थेरो, भिक्खू पय्याबोधी थेरो, भिक्खु महाकशप, भिक्खू नागसेन,भिक्खु पय्यारक्षीत, भिक्खू पय्यावर्धन, भिक्खू पय्यावंस, भिक्खू गगनबोधी यांनी धम्म देशना दिली.

उद्घाटनप्रसंगी पुढे बोलतांना डॉ.उपगुप्त महास्थवीर म्हणाले की, सध्याच्या काळात जाती धम मिध्ये लोकांना विभागून विष पेरण्याचे काम होत आहे परंतु धम्मपरिषदांमध्ये तथागत बुद्धाचा समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता, पंचशील, अष्टशील, आर्य अष्टांगिक मार्ग या देशातील प्रत्येक नागरिकांना शिकविण्याचे काम करून देशात समता आणि बंधुत्व टिकून ठेवून भारतीय राज्यघटने मूलतत्त्व सांगितले जातात असे बोलून डॉ.उपगुक्त म्हणाली की, सुसंस्कृत समाज घडविण्याचे केंद्र हे बुद्ध विहार असतात त्यामुळे आम्ही शासनाकडे मागणी करणार आहोत की यापुढे गाव तेथे महाविहार निर्मितीचे कार्य शासनाने हाती घ्यावे परंतु पाळण्यापासून ते जाळण्यापर्यंत प्रत्येक कार्य शासनावर सोपवुन चालणार नाही समाजाची ही काही कर्तव्य आहेत तेव्हा समाजानेही आपली जबाबदारी ओळखून कार्य करणे गरजेचे आहे तेव्हाच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न पूर्णत्वास नेण्याचे कार्य होईल. यावेळी भंते उपगुक्त यांनी धम्मपरिषदा कशासाठी असतात या संदर्भात बोलताना सांगितले की संस्कृत जाती धर्मविरहित समाज निर्मिती करून समाजाला एकत्र आणण्यासाठी व भिक्खू संघानेही एकत्र येऊन समाजाला दिशा देण्याचे काम केले जावे म्हणून धम्मपरिषद असतात असेही ते म्हणाले यावेळी त्यांनी सध्याच्या राजकीय परिस्थितीवर बोट ठेवून धम्म चळवळीतून समाजाने एकत्र यावे असे आवाहन केले, यावेळी त्यांनी कालवश भन्ते काश्यप महाथेरो यांच्या कार्याचे कौतुक करून आजच्या भन्तेनी त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून कार्य करावे असे आवाहन केले. याप्रसंगी प्रास्ताविक भाषणात संयोजक पय्यारतन थेरो यांनी भंते कास्यप यांचे राहिलेले कार्य पूर्णत्वास नेण्याचा संकल्प केला तसेच या कार्यात विघ्न आणणाऱ्या लोकांना त्यांची जागा समाज दाखवेल असे सांगितले.

सूत्रसंचालन प्रकाश इंगोले यांनी केले तर आभार नंदकिशोर कांबळे यांनी मानले. यशस्वीतेसाठी सुप्रिया महिला मंडळाच्या सर्व सदस्यांनी व भिकू संघाने परिश्रम घेतले. परिषदेला मोठ्या संख्येने महिला पुरुष व युवकांची उपस्थिती होती. यावेळी भीम शाहीर दिनकर लोणकर व स्थानिक कलाकारांच्या भिम बुद्ध प्रेरणा गीतांचा कार्यक्रम झाला. परिषदेस आलेल्या जनतेसाठी महार रेजिमेंटच्या सेवानिवृत्त सैनिकांनी खिचडीचे वाटप केले तर भारतीय बौद्ध महासभेच्यावतीने पाण्याचे वाटप केले.

# सफाई कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी प्राधान्याने करावी– डॉ वावा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ फेब्रुवारी**

सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची दक्षता घेणे गरजेचे आहे. त्यामुळे जिल्ह्यात सफाई कर्मचाऱ्यांची नि:शुल्क आरोग्य तपासणी करण्याची व्यवस्था करण्यात यावी. त्यासाठी जिल्ह्यात शिबिरे घेवून सर्व सफाई कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी पूर्ण करावी, अशी सूचना राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य डॉ. पी. पी. वावा यांनी केली.




जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाची बैठक डॉ. वावा यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. बैठकीस जिल्हाधिकारी अभिनव गोयल, सदस्यांचे सल्लागार श्री. गिरजेंद्र, सहायक आयुक्त नगर पालिका प्रशासन विभाग अनंत जवादवार, समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त यादव गायकवाड, मुख्याधिकारी अरविंद मुंडे यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी डॉ. वावा यांच्या हस्ते सफाई कर्मचाऱ्यांना प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, पीएम जीवन ज्योती विमा योजना, अटल पेन्शन योजनेबाबतची माहिती देण्यात आली. तसेच सफाई कामगारांना प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, आयुष्मान भारत योजनेंतर्गत आभा कार्डचे वितरण डॉ. वावा यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. वावा म्हणाले की, केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची सफाई कर्मचाऱ्यांना मदत मिळण्यासाठी शासन निर्णयाची त्वरीत अंमलबजावणी करण्यात यावी. सफाई कामगारांना कठीण समस्यांना सामोरे जावे लागणार नाही. तसेच हक्कापासून सफाई कामगार वंचित राहणार नाही. याकडे संबंधित अधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे. सफाई कामगारांचे प्रलंबित प्रश्न निकाली काढण्याचे निर्देशही डॉ. वावा यांनी दिले. सफाई कर्मचाऱ्यांच्या मृत्यूनंतर केवळ अर्थसहाय्य न देता त्यासोबत त्यांच्या पाल्यांना माध्यमिक शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, वृध्द आई–वडिलांना पेंशन तसेच त्यांना घर नसल्यास घरबांधणीसाठी अर्थसहाय्य करणे गरजेचे असल्याचे मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्याची सूचनाही त्यांनी केली.

प्रारंभी डॉ. वावा यांनी जिल्ह्यातील महानगरपालिका, सर्व नगरपालिका व नगरपंचायतीचा आढावा घेतला. लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार वारसा हक्क नियुक्ती प्रकरणाचा आढावा घेण्यात आला. सफाई कर्मचारी कार्यरत असलेल्या सर्व आस्थापनांचा व त्यातील प्रलंबित असलेल्या प्रकरणांचाही त्यांनी आढावा घेतला.

सफाई कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करावी तसेच अस्थायी व स्थायी सर्व सफाई कर्मचाऱ्यांना गणवेश, गमबुट, हँडग्लोज, रेनकोट, थंडीचे स्वेटर आदी साहित्य वेळोवेळी पुरवठा करण्यात यावा. त्यांच्या ओळखपत्रावर मोबाईल क्रमांक, रक्तगट, ईपीएफ, ईएसआयसी नंबरही अनिवार्य करण्यात यावा. आणि सफाई कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर करण्यात यावे. त्यांचे वेतन वेळेवर होत असल्याची डॉ. वावा यांनी खात्री केली. यावेळी सफाई कर्मचारी व त्यांच्या संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# निराधारांना आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ फेब्रुवारी**

संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती योजना अंतर्गत लाभ घेणाऱ्या लाभार्थींनी थेट हस्तांतरण प्रणालीद्वारे अनुदान मिळण्यासाठी संबंधीत बँकेत जाऊन बँक खाते आधार व मोबाईल क्रमांकाशी संलग्न करून घेण्यासाठी संबंधीत बँकेत जाऊन एनपीसीआय फार्म भरून डीबीटी करून घ्यावे. डीबीटी झाल्यानंतर आधारकार्ड झेरॉक्स, आधार कार्ड संलग्न बँक खाते पासबुक झेरॉक्स व आधार संलग्न मोबाईल क्रमांक आदी माहीती जमा करावी दि १५ फेब्रुवारीपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन तहसीलदार श्रीकांत भूजबळ यांनी केले आहे.